# प्रकरण 1 - क्रांतीकारी आणि डाव्या चळवळी

**श्यामजी कृष्ण वर्मा आणि इंडिया हाऊस:-**

काठेवाडचे रहिवासी असलेल्या श्यामर्जीनी केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेतले व ते बॅरिस्टर बनले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक संस्थानांमधे काम केले पण इंग्रज राजकीय प्रतिनिधीच्या (*British political Agent)* व्यवहाराने दुखावल्या जाऊन त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी लंडनंची निवड केली. १९०५ मधे लंडन येथे श्यामर्जीनी 'भारत स्वशासन समिती' *(India Home Rule Society)* स्थापन केली जी 'इंडिया हाऊस' *(India House)* म्हणून ओळखली जाऊ लागली. आपल्या कार्यासाठी त्यांनी '*Indian Sociologist*' नावाची मासिक पत्रिका सुरू केली. परदेशात येणाऱ्या योग्य भारतियांकरिता श्यामर्जीनी प्रत्येकी एक हजार रुपयाच्या सहा फेलोशिप (*fellowship)* सुरू केल्या. लवकरच इंडिया हाऊस म्हणजे लंडनला रहाणाऱ्या भारतियांच्या चळवळीचे केंद्र बनले. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, लाला हरदयाळ, मदनलाल धिंगरा त्यापैकीच होते.

पुण्याच्या फर्ग्यूसन महाविद्यालयातून पदवी घेतलेले सावरकर श्यामजींच्या सवलतीचा फायदा घेऊन जून १९०६ मधे लंडनला गेले. सावरकरांनी नाशिक येथे १९०० मधे 'मित्र मेळा' नावाची संस्था सुरू केली. पुढे मॅझिनीच्या 'तरुण इटली' *(Young Italy)* संस्थेप्रमाणे सावरकरांनी १९०४ मधे मित्रमेळा नाव बदलवून 'अभिनव भारत' असे केले. पुढे लंडनला गेल्यावर सावरकर आणि समविचारी उत्साही तरुणांनी इंडिया हाऊसला इंग्रजविरोधी व भारताच्या समर्थनाचे प्रचारकेंद्र बनविले. मे १९०८ मधे इंडिया हाऊसने १८५७ च्या उठावाची सुवर्णजंयती साजरी करण्याचे ठरविले. त्यावेळी सावरकरांनी ह्या उठावाला 'भारताचा स्वातंत्र्य संग्राम' असे म्हटले. आपले विचार त्यांनी '*The Indian war of Independence*' ह्या आपल्या पुस्तकातून विस्तृतपणे व्यक्त केले. त्याचप्रकारे '*The Grave Warning*' नावाची लघुपुस्तिका काढून लंडनमधे वाटण्यात आली व काही प्रती भारतात पाठविण्यात आल्या.

१९०९ मधे मदनलाल धिंगराने इंडिया ऑफिसचा राजकीय सहाय्यक कर्नल विलियम कर्झन वायली ह्यांस गोळी घालून ठार केले. त्यावर सरकारने कठोर कारवाई केली. मदनलाल धिंगराला पकडून फाशी देण्यात आले. सावरकरांनाही पकडण्यात आले व आजन्म् हद्दपारीची (*transportation for life)* शिक्षा करण्यात आली. श्यामजी कृष्ण वर्मांनी लंडन सोडले व ते पॅरिसला निघून गेले. परिणामी इंडिया हाऊसमधील हालचाली थंडावल्या.

२१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकचा कुप्रसिद्ध जिल्हा मॅजिस्ट्रेट जॅक्सन हयाला ठार मारण्यात आले. त्यावेळी अभिनव भारताच्या महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात अनेक शाखा होत्या. अहमदाबाद बॉम्ब खटला (नोव्हेंबर १९०९), सातारा खटला (१९१०) या पश्चिम भारतातील क्रांतिकारी चळवळीच्या इतर घटना होत्या.

**विष्णू गणेश पिंगळे :-**

पुणे जिल्ह्यातील 'गदर' पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते १९११ साली वॉशिंग्टण विद्यापीठात विद्युत अभियांत्रिकी विद्याशाखेत त्यांनी प्रवेश मिळवला होता. हिंदी ते मजबूत बांध्याचे, गोरेपान व पाणीदार डोळ्यांचे होते. सैनिकी छावणीतून सशस्त्र उठाव करण्याची योजना इतरांच्या सहकार्याने त्यांनी आखली होती. मीरतच्या सैनिकी छावणीत उठावाचा प्रसार करताना पिंगळे ब्रिटिशांच्या हाती सापडले. पंजाब व बंगालमधील क्रांतिकारकांशी ते संबंध ठेवून होते. पंजाब व बंगालमध्ये एकाच वेळी उठाव करण्याची योजना होती. पिंगळे यांना ब्रिटिशांनी फाशी दिले (१६ नोव्हेंबर १९१५). धाडस, साहस व आत्मबलिदानाचा संदेशच त्यांनी दिला.

**चापेकर बंधू :-**

दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव चापेकर हे तिघे चापेकर बंधू म्हणून ओळखले जात. चापेकर बंधुंना काँग्रेस, तिची भरणारी अधिवेशने व पास होणारे ठराव हे प्रचंड ढोंग आहे असे वाटे. दामोदर चापेकर यांनी १६ ऑक्टोबर १८९६ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला डांबर फासून खेटरांची माळ घातली होती. तिन्ही चापेकर बंधू ब्रिटिश सत्तेचे द्वेष्टे होते. काँग्रेस सामाजिक परिषद, इंग्रजी शिक्षण घेतलेले पांढरपेशी मंडळी व सुधारकमंडळी याचा चापेकर बंधु तिरस्कार करत. धर्मातर करून इंग्रज राजवटीची भलावण करणाऱ्या मुंबईच्या प्रो. बोलिणकरांना दामोदर चापेकर यांनी भररस्त्यात चोप दिला होता. इ.स. १८९६-९७ मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला तेव्हा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. सोबत प्लेगची भयंकर साथ आली. लष्कराच्या साहाय्याने सरकारने लोकांना घराबाहेर काढले गेले. लष्कराने पुणेकरांवर भयंकर अत्याचार केले. त्याबाबतच्या तक्रारी पुणेकरांनी ब्रिटिश सरकारकडे पाठवल्याही होत्या; पण त्याची दखल घेतली जात नसे. ब्रिटिश राजवट आपला देश, धर्म व संस्कृतीवर मोठा हल्ला आहे, असे चापेकर बंधूना वाटत होते. टिळकांनी 'केसरी'त लेख लिहून सरकारच्या प्लेग निवारण कार्यावर भयंकर टीका केली होती. प्लेग कमिशनर रँड व ऑम्हर्स्ट या दोघांची हत्या २२ जून १८९७ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवाचा समारंभ आटोपून परत जात असताना पुण्यात गणेशखिंड येथे चापेकर बंधूनी केली. त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरून गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभी द्रविड बंधूनी या कटाची बातमी केवळ आर्थिक लाभापोटी (२०,००० रु. च्या) सरकारला दिली. वासुदेव चापेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूना (गणेश व रामचंद्र द्रविड) ठार केले. ८ फेब्रुवारी १८९९ ब्रिटिश सरकारने वासुदेव चापेकर १८ एप्रिल १८९८, १० मे रोजी महादेव नियक रानडे, १२ मे १८९९ रोजी बाळकृष्ण चापेकर यांना फाशीची शिक्षा दिली. याप्रकरणी टिळकांचाही हात असल्याचे समजून त्यांना दीड वर्षाची शिक्षा ब्रिटिशांनी दिली. रँडच्या वधानंतर सरकारने जी दडपशाही अवलंबविली त्याचा निषेध म्हणून टिळकांनी 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' 'राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे' या शीर्षकाचे लेख केसरीत लिहिले होते. दामोदर चापेकर यांची आई पुत्राच्या फाशीच्या वार्तेने मृत्यू पावली. वडिलांचेही वर्षभरातच निधन झाले. चापेकर बंधू मात्र सामाजिक बाबतीत सनातनी व कर्मठ होते. बालविवाहाचे पुरस्कर्ते होते. विधवांच्या विवाहाचे समर्थक नव्हते. इंग्रजी शिक्षण व पाश्चात्त्य संस्कृतीचे ते विरोधक होते. अनंत लक्ष्मण कान्हेरे :- वि. दा. सावरकरांचे बंधू गणेश दामोदर सावरकर यांच्या घराच्या झडतीत बरीच आक्षेपार्ह कागदपत्रे ब्रिटिश सरकारला सापडली म्हणून सरकारने त्यांच्यावर खटला भरला व त्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली. हा निकाल देणारा नाशिकचा न्यायाधीश जॅक्सनचा खून अनंत लक्ष्मण कान्हेरे या तरुणाने केला (२१ डिसेंबर १९०९) तेव्हा त्याचे वय फक्त १७ वर्षांचे होते. त्याने जॅक्शनवर एकापाठोपांठ सात गोळ्या झाडल्या. तो वि. दा. सावरकरांच्या 'अभिनव भारत' या संघटनेचा सदस्य होता. याप्रकरणी ३८ लोकांना अटक झाली. नाशिक कटाच्या खटल्यातील ३८ पैकी ३७ आरोपी ब्राह्मण होते. त्यातील तिघांना (अनंत कान्हेरे, कृष्णाजी कर्वे व विनायक देशपांडे) फाशी, तिघांना जन्मठेप व इतरांना सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती.

## वि. दा. सावरकर यांची अभिनव भारत संघटना

सावरकर तत्त्वज्ञ, विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी विचारवंत, समाजसुधारक व हिंदुत्ववादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने', 'हिंदू पादशाही', 'माझी जन्मठेप', 'हिंदुत्व', '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्युद्ध' हे त्यांचे ग्रंथ होत. चापेकर बंधूच्या आत्मबलिदानामुळे ते क्रांतिकार्याकडे आकर्षिले गेले. इ.स. १८९९ मध्ये नाशिक येथे त्यांनी 'राष्ट्रभक्त समूह' इ.स. १८९९ मध्ये 'मित्रमेळा' व इ.स. १९०४ मध्ये 'अभिनव 'भारत' या संघटना स्थापन केल्या. 'अभिनव भारत'चे वि. दा. सावरकर अध्यक्ष होते, तर व्ही. व्ही. एस. अय्यर उपाध्यक्ष होते. मराठी भाषिकांच्या मुलखातील 'अभिनव भारत' ही सर्वात मोठी व गाजलेली संघटना होय. या संघटनेच्या मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर, नाशिक, खानदेशात एकूण ३९ शाखा होत्या. खुद्द स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, सावरकर बंधूच्या चरित्रकारांनी तसेच अभिनव भारताचे इतिहासकार विष्णुपंत भट यांनी या संघटनेबाबत विस्ताराने लिहिले आहे. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची शपथ या संघटनेच्या सभासदांना घ्यावी लागे. बंगालच्या फाळणीच्या वेळी सावरकरांनी विदेशी मालाच्या होळ्या केल्या व

स्वदेशींचा पुरस्कार केला. कायद्याचा अभ्यास करण्यासाठी ते इंग्लंडला गेले. परंतु तेथील हिंदी तरुणांच्या मनात क्रांतीचे बीजारोपण करूनच मी हिंदुस्थानात परतेन असे आश्वासन त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना इंग्लंडला जाताना दिले होते. सावरकरांनी ८ मे १९०८ रोजी 'इंडिया हाऊस' येथे इ.स. १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यास ५० वर्षे झाली म्हणून महोत्सव साजरा केला. सावरकरांचे बंधू गणेश सावरकर (ऊर्फ बाबाराव सावरकर) यांना इंग्रज द्वेषाच्या व स्वातंत्र्यप्रेमाच्या काही कविता प्रसिद्ध केल्या म्हणून नाशिकचे कलेक्टर जॅक्सनने जन्मठेपेची शिक्षा दिली (११ एप्रिल १९१०) जॅक्सनचा खून अनंत लक्ष्मण कान्हेरे याने केला. पण या कामी सावरकरांनी त्यास मदत केली म्हणून सावरकरांवर नाशिकच्या सेशन कोर्टापुढे खटला चालला. २२ मार्च १९११ रोजी त्यांना ५० वर्षाची शिक्षा फर्माविण्यात आली होती. तेव्हा सावरकरांचे वय फक्त २८ वर्षांचे होते. शिक्षेची वर्षे ऐकून सावरकर उद्‌गारले, '५० वर्षे भारतात ब्रिटिशांचे राज्य राहणार तरी आहे काय?' इ.स.१९२४ पर्यंत ते अंदमानच्या तुरुंगात होते तर इ.स. १९२४ ते ३७ या काळात रत्नागिरी येथे तुरुंगात होते. इ.स. १९३७ मध्ये त्यांची बिनशर्त मुक्तता झाल्यानंतर ते हिंदू महासभेचे अध्यक्ष बनले. उर्वरित काळात त्यांनी हिंदूंचे संघटन केले. सावरकरांच्या ऐतिहासिक उडीची घटना ९ जुलै १९१० रोजी घडली (मार्सेलिस बंदर). या घटनेबाबत ब्रिटिशांना आधीच संशय होता. फ्रेंच सरकारने ब्रिटिशांना सावरकरांना पकडण्यास मदत केली होती.

'अभिनव भारत'चे इतिहासकार विष्णुपंत भट यांनी म्हटले आहे की, 'अभिनव भारत'चा इतिहास लिहिणाऱ्या भावी इतिहासकाराला उपयोगी पडतील अशी कागदपत्रे जपून ठेवण्याची बाबांना (बाबाराव सावरकर) हौस होती आणि त्यांची ही इतिहासलोलुपताच आम्हाला नडली.' बाबांच्या घरातील झडतीत तात्यांनी (वि. दा. सावरकर) त्यांना व बाल सावरकरांना पाठविलेली ८ पत्रे मिळाली. त्याचबरोबर ५ टंकलिखित पानांचे एक इंग्रजी पत्रक पाठविले. विशेष म्हणजे त्या पत्रकात खुदीराम, बरिंद्र, प्रफुल्ल, उल्हास वगैरे अलीपूर खटल्यातील आरोपींचा गौरवपूर्ण उल्लेख होता. हे पत्रक निनावी असले तरी तात्याराव सावरकरांच्या हातचे होते हे ब्रिटिशांच्या लक्षात आहे.

२१ नोव्हेंबर १९०९ रोजी न्या. चंदावरकर, न्या. हिटन यांच्या खंडपीठाने बाबाराव सावरकर यांना जन्मठेप व काळ्या पाण्याच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले. बाबारावांच्या कविता राजद्रोहाला चिथावणी देतात असे त्या दोघा न्यायमूर्तीचे मत होते. बाबांना झालेल्या शिक्षेमुळे 'अभिनव भारत' मधील तरुण अस्वस्थ झाले. तरुणांच्या एका गटाला बाबारावांना झालेल्या शिक्षेचा सूड घ्यावा असे वाटत होते. या गटाचे नेते होते कृष्णाजी कर्वे. विनायक देशपांडे, शंकर सोमण, वामन जोशी, गणू वैद्य हे तरुण कृष्णाजी कर्वे यांचे नेतृत्व मानणारे होते. बाबारावांना शिक्षा दिली म्हणून औरंगाबादचे तरुण अनंत कान्हेरे संतापले. ते नाशिकला आले. २१ डिसेंबर १९०९ रोजी त्यांनी जॅक्सनचा खून केला. कान्हेरे यांना पकडल्यानंतर खून आपण एकट्याने केल्याची कबुली त्यानी दिली.

जॅक्सनच्या खुनानंतर कृष्णाजीपंत खरे, गोपाळ पाटणकर, विष्णुपंत भट, गोपाळ धारप, केशव परांजपे, विनायक देशपांडे, वासुदेव कुलकर्णी, गोविंद बापट, विनायक फुलंब्रीकर इत्यादींना अटक करण्यात आली. अमरावती, यवतमाळ, बेळगाव येथेही क्रांतीकारक संघटना कार्यरत होत्या.

**कोल्हापुरातील शिवाजी क्लब :-**

कोल्हापूर संस्थानातही सशस्त्र क्रांतिकारी आंदोलन वाढत गेले; पण कोल्हापुरातील क्रांतिकारी आंदोलन हे पुणे, नाशिक जिल्ह्यांतील आंदोलनाप्रमाणे प्रखर नव्हते. इ.स. १८९३ मध्ये कोल्हापुरात हणुमंतराव कुलकर्णी यांनी शिवाजी क्लबची स्थापना केली होती. या क्लबच्या स्थापनेत त्यांचे बंधू चिंतामणराव, रघुनाथ विष्णू खानविलकर, बाळाचार्य खुपेरकरशास्त्री यांचाही पुढाकार होता. या क्लबमधील सभासदांना कुस्ती, दांडपट्टा, तलवार चालविणे, डोंगर चढणे इत्यादींचे शिक्षण दिले जाई. या क्लबच्या स्थापनेपूर्वी कोल्हापुरात 'बालमित्र समाज', 'बाल-गोहत्या प्रतिबंधक समाज या दोन संघटना अस्तित्वात होत्या. त्यांचे विलीनीकरण करूनच शिवाजी क्लब उदयास आला होता. पुण्याच्या चापेकर क्लबशी कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचे संबंध होते. शिवाजी क्लबमध्ये जे महत्त्वाचे सभासद होते त्यांची नावे

दामोदर (दामू) हरी जोशी, गणेश मोडक, हनुमंत देशपांडे, गंगाधर विश्वनाथ गोखले, रामचंद्र गणेश गद्रे. शिवाजी क्लबच्या स्थापनेनंतर १५ वर्षांतच सदस्य संख्या ३०० झाली होती. या क्लबमध्ये प्रामुख्याने ब्राह्मण संख्येने जास्त होते. पाठारे, कायस्थप्रभू, मराठा व अन्य ब्राह्मणेतरही होते. शिवाजी क्लबचे सभासद कवायतीचा, तलवार चालवणे, डोंगर चढणे याचा सराव करत असत. लोकमान्य टिळक व त्यांच्या केसरी पत्राचा शिवाजी कल्बच्या चळवळीस पाठिंबा होता. १८९९ पर्यंत शिवाजी क्लबर राजर्षी शाहू व त्यांचे बंधू बापूसाहेब कागलकर यांचा वरदहस्त होता. शिवाजी क्लब ही क्रांतिकारकांची चळवळ वाढली तर आपणास ब्रिटिश सरकार जाब विचारेल याची भीती शाहू महाराजांना असल्याने त्यांनी ही चळवळ दडपून टाकली. ब्राह्मणेतरांनी शिवाजी क्लबशी संबंध ठेवू नये असे आवाहन राजर्षी शाहूंनी केले. ब्राह्मणेतरांनी शिवाजी क्लबशी संबंध तोडले. बाँबची निर्मिती कशी करावी याची माहिती सांगणारी भित्तिपत्रके इ.स.१९०८ मध्ये कोल्हापुरात लावण्यात आली होती. पण शाहू महाराजांनी यांची चौकशी करूनं खटले भरले व अनेकांना तुरुंगात टाकले.

**बीडचा उठाव (इ.स. १८९९) :-**

हैदराबाद संस्थानातील बीड हा मागासलेला जिल्हा, पण मुंबई प्रांतातील क्रांतिकारकांनी सशस्त्र क्रांतीचे केंद्र म्हणून या जिल्ह्याची निवड केली होती. इ.स. १८९८-९९ मध्ये बीडमध्ये सदाशिव नीळकंठ जोशी (जे मूळचे कुलाबा जिल्ह्यातील होते). यांनी भारतातील अनेक प्रांतांत भ्रमण केले होते. अनेक नावे धारण करून ते वावरत असत. त्यांनी धारण केलेली नावे - रावसाहेब पेशवा, भाऊसाहेब लिमये, गणेश केशव लिमये, राजेसाहेब विठ्ठल घत्रे, बळवंत जगदंब, भाऊसाहेब काशीनाथ खाजगीवाले. त्यांना अनेक भाषा येत होत्या. बीड, औरंगाबाद व उस्मानाबाद या जिल्ह्यांतील तरुणांची मदत घेऊन इंग्रज सरकारला आव्हान दिले होते. पुणे, नाशिक, बेळगाव येथून काही तरुण बीड उठावात सामील झाले होते. डॉ. य. दि. फडके यांच्या मते, 'कोल्हापूरच्या शिवाजी क्लबशी सदाशिव नीळकंठ जोशीचे संबंध असावेत.' पाच महिने इंग्रज सत्तेविरुद्ध त्यांचा उठाव सुरू होता. या उठावात अनेक तरुण मारले गेले, कित्येक जखमी झाले. इ.स. १८९९ नंतर या उठावाचा जोर ओसरला. सदाशिव जोशी औरंगाबादमार्गे अमरावतीस गेले व कायमचे परागंदा झाले. ते कधीच पोलिसांच्या हाती लागले नाहीत. सदाशिव जोशी पोलीसांना कधीच सापडले नाहीत. या उठावाची डाकेखोर व दरोडेखोर म्हणून ब्रिटिशांनी वासलात लावली. नेपाळमध्ये बंदुका तयार करण्याचा कारखाना काढण्याचा प्रयत्न काकासाहेब खाडिलकर यांनी केला.

**मादाम कामा (इ.स. १८६१-१९३६) :-**

जर्मनीतील स्टुटगार्ड येथे इ.स.१९०७ मध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसच्या अधिवेशनात मादाम कामा यांनी भारताचा पहिला राष्ट्रध्वज फडकवण्याचे धाडस केले. त्यावर ७ तारे व कमळाचे फूल होते. २४ सप्टेंबर १८६१ हा त्यांचा जन्मदिवस, तर १२ ऑगस्ट १९३६ हा त्यांचा मृत्यू दिन. मुंबईतील एक सधन पारशी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांना अनेक भाषा येत होत्या. त्यांचे वडील सोराबजी पटेल हे मुंबईतील एक धनाढ्य गृहस्थ होते. मादाम कामा यांचा विवाह रुस्तुम कामा यांच्याशी झाला होता. पण तो दुर्दैवी ठरला. त्यांच्या नशिबी सुखी संसार लिहिलेला नव्हता. त्यांच्या अंत्यसंस्कारालादेखील त्यांचा पती हजर नव्हता. विशेष म्हणजे त्या काळात तिने क्रिकेटमध्ये प्रावीण्य मिळविले होते. इ.स.१८९६ मध्ये मुंबईत आलेल्या प्लेगच्या साथीत त्यांनी परिचारिका म्हणून काम केले; पण रोग्यांची सेवाशुश्रूषा करता करता त्यांनाच त्याची काही काळ लागण झाली होती. राजकीय नेत्यांचा प्रभाव पडल्याने त्यांची दिशाच बदलून गेली.

इ.स. १९०६ मध्ये त्या लंडनला गेल्या व तेथेच त्यांच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली. त्याच वर्षी स्वा. विनायक दामोदर सावरकर हे स्वातंत्र्यप्राप्तीचा उद्देश मनात ठेवून लंडनला पोहोचले होते. सावरकरांनी तेथे 'फ्री इंडिया सोसायटी'ची स्थापना केली होती आणि 'इंडिया हाऊस'मध्ये ब्रिटिशविरोधी चळवळींनी जोर धरला. त्या देश क्रांतिकार्यात मादाम कामाही सहभागी होऊ लागल्या. ब्रिटनमध्ये त्या भाषणे देऊ लागल्या. पण ब्रिटनने त्यांच्या राजकीय

कार्यावर बंदी घातली. ब्रिटिश सरकारने त्यांना सोडून द्यायचा आदेश दिला आणि इ.स. १९०७ मध्ये त्या पॅरिसमध्ये स्थायिक झाल्या. तिथे त्यांनी न्यू इंडिया सोसायटीची स्थापना केली आणि सावरकरांचे कार्य पुढे चालू ठेवले. हे इ.स. १९०७ वर्ष एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार ठरले. त्याच वर्षी जर्मनीत स्टुटगार्ड येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी भारताचा पहिला राष्ट्रध्वज फडकावण्याचे केलेले धाडस अपूर्व असेच होते. 'हिरवा, केसरी व तांबडा' असे तीन रंगाचे पट्टे या झेंड्यासाठी वापरण्यात आले होते. त्यापैकी पहिल्या पट्ट्यावर आठ कमळे, दुसऱ्यावर वंदे मातरम् हा मंत्र आणि तिसऱ्यावर सूर्य व चंद्र यांच्या आकृती काढण्यात आल्या होत्या. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कल्पनेतून साकारलेला हा भारताचा पहिला राष्ट्रध्वज. भारतीय जनतेची स्वातंत्र्याची इच्छा आणि ब्रिटिशविरोधी सूर जगासमोर मांडण्याचा सावरकरांचा विचार यामुळे फलद्रूप झाला आणि त्यानंतर जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे मादाम कामा हा ध्वज फडकावत राहिल्या. आपल्या भाषणांतून, पत्रकांतून क्रांतीचा, स्वातंत्र्याचा संदेश देत राहिल्या. 'वंदे मातरम' मदन तलवार (मदनलाल धिंग्रांच्या स्मरणार्थ सावरकरांच्या सूचनेवरून दिलेले नाव) हे नियतकालिक प्रसिद्ध करीत राहिल्या. श्यामजी कृष्ण वर्माचे 'दि इंडियन सोशिऑलीस्ट', 'तलवार' या पत्रावर बंदी असूनही भारतात पोहोचत राहिली ती त्यांच्याच प्रयत्नांमुळे. क्रांतिकारकांची गीता ठरलेला स्वा. सावरकरांचा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ आपल्यापर्यंत पोहोचू शकला तोही मादाम कामांच्या अथक परिश्रमामुळे. त्यांच्या चातुर्यामुळेच. स्वा. सावकरांच्या त्या मार्से इथल्या ऐतिहासिक समुद्र उडीनंतर त्यांच्या सुटकेसाठी, त्यांना फ्रान्सच्या स्वाधीन तरी केले जावे यासाठी मादाम कामा यांनी प्रयत्नांची अक्षरशः पराकाष्ठा केली. त्यात त्यांना यश आले नाही तरी त्यांनी हे प्रकरण सतत पेटते ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर हा प्रश्न पेटत्ता राहिला. सावरकर बंधूची रवानगी अंदमानला झाल्यावर सावरकर कुटुंबीयांचा. आर्थिक भार हलका करण्याचे कार्य त्यांनी केले तसेच अनेकांनाही साहाय्य केले. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या आपल्या स्वातंत्र्यलढ्याची महिती अमेरिकेलाही व्हावी म्हणून त्या ऑक्टोबर १९०७ मध्ये अमेरिकेलाही गेल्या. तिथे त्यांनी केलेली भाषणे म्हणजे जणू 'भारताच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा'च होता. ती भाषणे छापून घेऊन त्याच्याही शेकडो प्रती भारतात पोहोचतील याची त्यांनी व्यवस्था केली. रशियन, फ्रेंच क्रांतिकारकांच्याही त्या संपर्कात असत. रशियन क्रांतिकारक त्यांना हिंदुस्थानची 'जॉन ऑफ आर्क' संबोधत असत.

इ.स.१९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू होतच मादाम कामांना आपल्या स्वाधीन करावे अशी मागणी ब्रिटिश सरकारने केली; पण ती मागणी फेटाळून फ्रेंच सरकारने त्यांना तिथेच स्थानबद्ध करून ठेवले. स्थानबद्धतेत असतानाच प्रकृतीही त्यांना त्रास देऊ लागली. स्वतंत्र झाल्यावरच आपल्या देशात परत जाईन असा मादाम कामा यांचा निर्धार होता; परंतु त्यांची प्रकृती जशी ढासळू लागली तशी त्यांना मायदेशीच्या भेटीची ओढ लागली. आता निदान आपला शेवट तरी मायदेशी व्हावा म्हणून इ.स.१९३५ मध्ये आपला स्वातंत्र्यध्वज कवेत घेऊनच त्या इथे परतल्या. १२ ऑगस्ट १९३६ रोजी मादाम कामा यांनी या जगाचा कायमचा निरोप घेतला. मदनलाल धिंग्रा यांचे बलिदान व आदर्श यांचे उदाहरण देऊन देशासाठी त्याग करण्याचे त्या आवाहन सतत करीत. स्त्री शिक्षणासाठी मादाम कामा आग्रही होत्या. मादाम कामांना 'सशस्त्र क्रांतिकारकांची माता' या नावाने ओळखले जाते. डॉ. के. के. चौधरी लिहितात, "क्रांतीकारकांची देशभक्ती, धैर्य, निर्धार व निस्सिम त्याग भावना यामुळे जनमाणसात राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्याची ऑकांक्षा निर्माण झाली."

**ब) अनुशिलन समितीः-**

बंगालमधील क्रांतीकार्याची सुरुवात बंगाली भद्रलोक समाजाने केली. पी. मित्रा नावाच्या व्यक्तीने 'अनुशिलने समिती स्थापन केल्याचे पुरावे मिळतात. बंगालच्या फाळणीनंतर परकिय मालावर बहिष्कार, आणि स्वदेशी चळवळीने चांगले मुळ धरले. परिणामी बंगालमध्ये कधीही न दिसून येणा-या राष्ट्रीय चळवळीने मुळ धरले होते. इ. स.१९०५ मध्ये बारीद्र कुमार घोषने 'भवानी मंदीर' नावाची पुस्तीका लिहून त्यात क्रांतीकार्य करण्याचे, संघटन तयार करण्यासाठी केंद्र बनविण्यासाठी माहिती दिली. अनुशिलन समिती प्रमाणे बंगालमध्ये इतरही गुप्त संघटना कार्य करीत होत्या. ज्यात साधना समाज, शक्ती समिती आणि युगंतर समिती प्रमुख क्रांतीकरी संघटना होत्या. याच सुमाराला बंगालमधील क्रांतीकारकांनी 'वर्तमान रणनिती' ही पुस्तीका लिहून युद्ध नियमांविषयी जागृती केली आणि युवकांना सैनिक शिक्षण

घेण्याचे अवाहन करण्यात आले. या शिवाय 'युगंतर आणि संध्या' या वृत्तपत्रातून सशस्त्र विद्रोहाची प्रेरणा बंगाली युवकांमध्ये निर्माण करण्याचे कार्य या समित्यांनी केले. युद्धावर या संस्थांचा विश्वास असल्याने अनुशिलन समितीचे दोन सदस्य बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी जपानला गेले आणि तेथून प्रशिक्षण पूर्ण करुन आल्यानंतर हेमचंद्र कानूनगो यांनी कलकत्त्याजवळ माणिकतल्ला येथे बॉम्ब तयार करण्याचा कारखाना सुरु केला. ब्रिटीश राज्य उलथून टाकण्यासाठी या सद्रयांनी सहा कलमी कार्यक्रम हाती घेतला.

१) वृत्तपत्राद्वारे प्रचार करुन सुशिक्षित वर्गात ब्रिटीश सत्तेविरोधात जागृती निर्माण करणे.साधारणतः ज्या घटना जहालवादाच्या उदयास कारणी भुत ठरल्या त्याच घटनांमुळे क्रांतीकारी राष्ट्रवादाचा उदय इ गला. मात्र क्रांतीकरकांना परिणाम जास्त लवकर हवे होते त्यांचा जहाल आणि मवाळांच्या आदर्शावर आणि कार्यपद्धतीवर विश्वास नव्हता. क्रांतीकारकांना असे वाटत होते की, राष्ट्रीय जिवनातील आवश्यक घटक राजकीय धार्मिक स्वातंत्र्य, नैतिक मुल्ये, आणि संस्कृती ब्रिटीश सरकार नष्ट करुन टाकील आणि त्याकरीता त्यांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब करुन ब्रिटीशांच्या जोखडातून भारताला मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले.

पाश्चात्य सम्राज्यवाद केवळ हिंसेच्या मार्गानेच समाप्त केला जावू शकतो यावर क्रांतीकारकांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या कार्यक्रमात बॉम्ब आणि पिस्तुलाचा वापर होता. या बाबतीत त्यांनी आर्यलँड पासून प्रेरणा घेतली होती.त्यांनी आपल्या गुप्त संस्था स्थापन केल्या त्यात त्यांनी तरुणांना सहभागी करुन घेतले होते. या गुप्त संस्थांमध्ये हत्त्यारांचे प्रशिक्षण देण्यात येत असे. शिवाय बाँम्ब बनविणे शिकविले जात असे. युरोपीयन अधिकाऱ्यांची हत्त्या करणे, त्यांचे मनोधैर्य खच्ची करणे, प्रशासन ठप्प करणे इ.मार्ग या क्रांतीकारकांनी अवलंबिले. त्यातून भारतात देशभक्तीची भावना वाढीस लागून अनेक तरुणांनी या क्रांतीकारी चळवळीत सहभाग घेतला.

१) वृत्तपत्राद्वारे प्रचार करुन सुशिक्षित वर्गात ब्रिटीश सत्तेविरोधात जागृती निर्माण करणे.

२) देशाच्या शहिदांच्या आत्मकथा संगीत आणि नाटकांच्या माध्यतातून लोकांपुढे मांडून मातृभुमीबद्दल प्रेम निर्माण करणे.

३) मोर्च, हरताळ, करुन ब्रिटीश सम्राज्यवाद्यांना व्यस्त ठेवणे.

४) सेनिक शिक्षण, व्यायाम, धार्मिक कार्यक्रम आणि शक्ती पूजा करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देणे.

५) हत्त्यारे बनवणे, बॉम्ब तयार करणे, पिस्तुले चोरुन आणणे.

६) देणगी आणि सरकारी लुटीच्या माध्यमातून पैसा मिळवणे.

या संस्था रशिया आणि इटलीच्या संस्थेच्या धर्तीवर स्थापन करण्यात आल्या होत्या. ६ डिसेंबर १९०७ ला मिदनापूर जवळ लेप्टनंट गर्व्हनरची गाडी उडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशाच प्रकारे बाक्काचा पहिला मॅजिस्ट्रेट एलन याचीही हत्त्या फेरण्याचा प्रयत्न करण्यात आला. या नंतर क्रांतीकारकांनी प्रेसिडेंसी गर्व्हनर किंग्जफोर्ड यांची हत्त्या करण्याचा कट रचला.कारण किंग्जफोर्डने अनेक लहान लहान गुन्ह्यांकरीता युवकांना फटके मारण्याचे आदेश दिले होते. खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चाकी यांनी ३० एप्रिल १९०८ ला मुजफ्फरपुरमध्ये त्यांच्या गाडीवर बॉम्ब टाकला. मात्र त्याच्यात श्रीमती केनेडी आणि त्यांची मुलगी ठार झाले. यावेळी क्रांतीकारक प्रफुल्ल चाकी यांना पकडण्यात आल्यावर त्यांनी गोळी घालून आत्महत्त्या केली. मात्र खुदीराम बोसवर खटला चालवून त्यांना फाशी देण्यात आले. त्यामुळे खुदीराम चोस बंगाली युवकांसाठी आदर्श बनले त्यांचे फोटो घराघरात लावण्यात आले शिवाय युवकांनी आपल्या धोतर आणि कपड्यांवर त्यांचे नाव लिहले.

बंगालमधील क्रांतीकारकांच्या या विद्रोही कारवाह्यांमुळे मुरारीकुपुर येथे छापा घालुन बॉम्ब आणि स्पोटके जप्प केली. बारींद्रकुमार घोष आणि त्यांचे बंधू अरविंद घोष यांच्यासह ३४ जणांना पकडण्यात येवून त्यांच्यावर खुणाचा

कट केल्याचा आरोप ठेवण्यात आला. अलीपूर येथील न्यायालयात या क्रांतीकारकांवर खटला चालविण्यात आल्यामुळे त्यास अलिपूर खटला 'म्हणून ओळखले जाते. हा खटला चालविणाऱ्या सरकारी वकिलाची, आणि एका पोलिस अधिका-याची न्यायालयाच्या इमारतीतच गोळ्या घालून हत्त्या करण्यात आली. या खटल्यात ३४ आरोपींपैकी १५ जणांवर आरोप सिद्ध झाला आणि बारींद्रकुमार घोष व त्यांच्या सहकाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. व त्यांचे बंधू अरविंद घोष निर्दोष सुटले. बंगालमधील या क्रांतीकारकांचा बेत असफल होण्यास त्यांचाच एक सहकारी कारणी भुत ठरला. बारीद्रबाबूंचा मुरारीकुपूरचा ठावठिकाणा नरेंद्र गोस्वामी 'या त्यांच्या सहकायाने पोलिसांना सांगीतला. त्यामुळेच अलिपूर खटल्याचे क्रांतीकारक पोलिसांना एकाच ठिकाणी सापडले. नरेंद्र गोस्वामी माफीचा साक्षिदार झाल्याचे क्रांतीकारकांना कळून आले. कन्हैयालाल दत्त आणि सत्येंद्रनाथ बोस हेही या खटल्याचे आरोपी होते. आपल्याच एका मित्राने आपला विश्वासघात करावा हे त्यांना सहन झाले नाही त्यांनी त्यांनी तुरुंगातच नरेंद्र गोस्वामीचा खुन केला.या बाबत. कन्हैयालाल दत्त यास फाशी देण्यात आले.

बारीद्रकुमार घोष यांच्यानंतर अनुशिलन समितीची धुरा ढाक्क्याच्या पुलिन दास यांनी स्विकारली. त्यानंतर ही संघटना युगंतर समिती म्हणून संबोधली जावू लागली. पुलीन दास यांनी पुर्व बंगालमधील प्रत्येक शहरात अनुशिलन समितीच्या शाखा स्थापन करुन वारीद्रबाबूंचे कार्य तेवढ्याच जोमाने सुरु ठेवले. १९०७ ते १९१७ या दशकात या समितीने ६४ अधिका-यांचा बळी घेतला. त्यात मुख्यतः पोलिस अधिकाऱ्यांचा समावेश असला तरी पैशाच्या लोभाने पोलिसांशी हातमिळवणी करणाऱ्या दगाबाजांना कंठस्थान घालण्यास समितीचे कार्यकर्ते कचरले नाहीत. त्यामुळे बंगालमध्ये घडलेल्या प्रत्येक घटनेबाबत सरकारने या समितीलाच जबाबदार धरले.

पिस्तुले आणि हत्त्यारे मिळवण्यासाठी समितीने कोकेनसारख्या आमली पदार्थाच्या ने- आण करणाऱ्या टोळीशी संधान बांधले. हे लोक अफगणिस्तानपासून ते आसामपर्यंत या आमली पदार्याची तष्करी करीत. त्यांना फक्त पैसा हवा होता म्हणून पुलिन दास यांनी या टोळीतील काही लोकांशी संधान बांधून त्यांच्या हातावर पैसे ठेवले परिणामी त्यांनी कोकेनेऐवजी पिस्तुले आणि काडतुसे यांनी भरलेल्या पेट्या ढाक्क्याला आणल्या त्यामुळे अनुशिलन समितीला हत्त्यारांचा कधीच तुटवडा पडला नाही. या शिवाय परदेशी जहाजांवरील खलास्यांशी पुलिन दास यांनी मैत्री केली. या खलास्यांकडूनही शस्त्रास्त्रे मागवण्यात बाबूंना यश आले.

**क) गदर पार्टी :-**

बंगाल आणि महाराष्ट्राप्रमाणे पंजाबमध्ये ही क्रांतीकारक चळवळीची मुळे खोलवर रुजली होती. विष्णु गणेश पिंगळेस पंजाबमध्ये क्रांतीकार्य आणि हत्त्यारे बनविण्यास जे प्रोत्साहन मिळाले त्यामुळे क्रांतीकारकांमध्ये जोश निर्माण इ ाला. त्यामुळे या क्रांतीकारकांनी पंजाब आणि बंगालमध्ये एकाच वेळेला उठाव करण्याचे ठरविले मात्र ही योजना फसली आणि अनेक क्रांतीकारकांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. या क्रांतीकारकांमधील १४७ जणांवर लाहोर न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले त्यामुळे ह्या खटल्यास लाहोर कट खटला म्हणून ओळखले जाते. या खटल्यात २८ जणांना फाशी देण्यात आली. त्यात विष्णु गणेश पिंगळे यांचा समावेश होता.

पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभुमीवर पंजाबमधून अमेरीकेत स्थलांतरीत झालेल्या युवकांनी बाबा सोहनसिंग यांच्या नेतृत्वात 'गदर पार्टीची स्थापना केली. त्यांनी तेथे गदर नावाचे एक वृत्तपत्र काढले लाला हरदयाळ त्याचे संपादक होते. इ. स.१९१४ मध्ये अमेरीकेतील स्टाकहोम येथे ज्वालासिंगाच्या अद्यक्षतेखाली परिषद घेण्यात आली. तीला योग्य प्रतिसाद मिळून पार्टीच्या अनेक देशात शाखा सुरु करण्यात आल्या. लाला हरदयाळ ही पार्टीच्या मागील जिवंत प्रेरणा होती. त्यांनी अनेक शिख तरुणांना मातृभुमीसाठी बलिदान करण्याचे अवाहन केले. या पक्षातील बाबा गुरुदीतसिंग हा युवकांचा नेता होता. त्यांनी भारतात जाण्यासाठी एक जपानी जहाज ठरवून दक्षिण पूर्व अशियात रहाणाऱ्या ३७६ भारतीयांना घेवून हे जहाज वैकुवर कडे निघाले. रस्त्यात गदर पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांनी या प्रवास्यांना प्रोत्साहन देण्यासाठी भाषणे दिली. त्यांच्या या प्रवासाची माहिती मिळाल्याने बँकुवरच्या वृत्तपत्रातून घ्युर्वेचे वाढणारे आक्रमण ङ

अशा आशयाचे लेख छापले. त्यामुळे परकिय जहाजांवरचे कायदे कडक करण्यात येवून सरकारने या जहाजांना कॅनडाच्या सिमेत प्रवेश करण्यास मज्जाव केला आणि बंदरात प्रवेश करण्यापुर्वीच पोलिसांनी जहाजाला वेढा दिला. कॅनडातील भारतीय नेते हुसेन रहिम, सोहन लाल पाठक आणि बलवंतसिंग तर अमेरीकेतील नेते बर्कात्तल्ला, भगवान सिंग, रामचंद्र आणि सोहनसिंग भाकना यांच्या अंदोलनानंतरही कामागाटामारु जहाजाला कॅनडाच्या सिमेत प्रवेश करु दिला नाही. या जहाजाच्या जपानला पोहचण्यापुर्वीच पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला. तरीही ब्रिटीश सरकारने जाहिर केले की, जहाज कलकत्ता पोहचण्यापुर्वी कोणत्याही प्रवाश्याला खाली उतरु दिले जाणार नाही. त्यामुळ प्रवासी आणि पोलिस यांच्यात जहाज बजबज येथे पोहचल्यावर संघर्ष झाला या संघर्षात १८ यात्रेकरु दार झाले. आणि २०२ पकडण्यात आले इतरांना पळून जाण्यात यश आले. याच काळात कर्तार सिंग सरापा नावाचे एक तरुण अमेरीकेतून शिखांना संघटीत करण्यासाठी पंजाबमध्ये आले. त्यांनी गदर चळवळ मोठ्या जोमाने पुढे चालविली मात्र १९१५ नंतर ही चळवळ काहीशी मागे पडलेली दिसते.

### ड) हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोशिएशनः-

बंगाल, महाराष्ट्र आणि पंजाबप्रमाणे उत्तर भारतात सचिंद्र सन्याल, जोगेश चटर्जी आणि रामप्रसाद बिस्मील यांनी क्रांतीकारकांचे संघटन तयार केले. आक्टोबर १९२४ मध्ये कानपूरला एक बैठक आयोजित करुन आपल्या क्रांतीकारी संघटनेचे पुर्नगठन करण्याचे प्रयत्न केले. त्यातून हिंदुस्थान रिपब्लिकन असोशिएशन ही संस्था स्थापन करण्यात आली. ते क्रांतीकारी मार्गाने वसाहतीक शासन नष्ट करुन त्याजागी प्रौढ मताधिकारावर अधारीत भारताचे स्वतंत्र्य प्रजासत्ताक स्थापन करु ईच्छीत होते. या संघटनेच्या सदस्यांनी लोकांमध्ये प्रचार करण्यासाठी आणि शस्वे खरेदी करण्यासाठी सरकारी खजिना लुटण्याचा निश्चय केला. यामध्ये सर्वात महत्वपूर्ण लुट काकोरी येचील होती. यासाठी ९ ऑगस्ट १९२५ रोजी १० क्रांतीकारकांनी सहारनपुर ते लखनऊ जाणारी रेल्वेगाडी काकोरी या छोट्याशा स्थानकावर थांबविली. सरकारी लुटीमध्ये शामिल असलेल्या अनेक क्रांतीकारकांना पकडण्यात सरकारला यश आले. या कैद्यांवर खटला चालविण्यात आला हा खटलां काकोरी षडयंत्र केस म्हणून प्रसिद्ध आहे. रामप्रसाद बिस्मोल, रोशन सिंग, अशफाकउल्ला खान आणि राजेंद्र लाहरी यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. इतर ४ व्यक्तींना जन्मठेप आणि १७ व्यक्तीना तुरुंगवास देण्यात आला. चारही क्रांतीकारक हसत हसत फासावर गेले. हिंदूस्थान रिपब्लिकन असोशिएशनच्या क्रांतीकारकांपैकी फक्त चंद्रशेखर आजाद पोलिसांच्या हातावर तुरी देवून निसटले.

काकोरी घटनेमुळे क्रांतीकारकांना धक्का बसला मात्र हेच कार्य पुढे सुरु ठेवण्यासाठी युवकांचा एक गट पुढे आला आणि या गटाने हिंदूस्थान रिपब्लिकन असोशिएशनचे कार्य पुढे चालविले यात विजयकुमार सिन्हा, शिव वर्मा, जयदेव कपुर उत्तर प्रदेशातून तर पंजाबमधून भगतसिंग, भवानीचरण बोहरा, सुखदेव यांनी चंद्रशेखर आजाद यांच्या नेतृत्वात हिंदूस्थान रिपब्लिकन असोशिएशन ची पुर्नस्थापना केली. ते समाजवादी विचारांनी प्रभावित झाले होते. त्यांनी ९ आणि १० आक्टो १९२८ रोजी दिल्लीत फिरोजशहा कोटला येथे एक बैठक घेतली आणि समाजवादी विचारांच्या प्रभावामुळे या संघटनेचे नामकरण हिंदूस्थान सोर्शेलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन असे करण्यात आले.

३० आक्टो १९२८ या दिवशी सायमन कमिशनविरुद्ध लाहोरमध्ये झालेल्या मार्चामध्ये लाला लचपतरॉय यांच्यावर साँडर्स या इंग्रज अधिकाऱ्याने लाठीहल्ला केला त्यात त्यांचा मृत्यु झाला. या घटनेचा सूड घेण्याची भावन क्रांतीकारकांमध्ये निर्माण झाली. या करीता १७ डिसेंबर १९२८ रोजी भगतसिंग, चंद्रशेखर आजाद आणि राजगुरु यांनी साँडर्सची हत्त्या केली. साँडर्सच्या हत्त्येनंतर लाहोर शहरात पत्रके लावण्यात आली या पत्रकांमध्ये "आमच्या ३० कोटी जनतेला प्रिय असलेलल्या पुज्य लालाजीच्या छातीवीर साँडर्ससारख्या हलकट माणसाने प्रहार करावेत ही गोष्ट आम्हाला न माणवण्यासारखी होती म्हणून आम्ही लालाजींच्या मृत्युचा सूड घेतला." असे आपले म्हणणे क्रांतीकारकांनी या पत्रकाद्वारे मांडले होते.

व्यक्तीगत शैर्याच्या परंपराच या संघटनेत निर्माण झाली त्याचबरोबर या व्यक्तींनी आपल्या विचारांचा जनतेत प्रचार करण्याचे ठरविले व त्यातून क्रांतीकारी अंदोलनाचे संघटने केले जावू शकते असे या क्रांतीकारकांना वाटत होते त्या करीता ८ एप्रिल १९२९ रोजी केंद्रीय कायदेमंडळात *Treade Dispute Bill* श्रम विवाद कायदा, आणि *Public Sefty Bill* जन सुरक्षा कायदा पारीत करण्यात येणार होता. हा कायदा म्हणजे भारतीय कामगारांच्या न्याय हक्कांवर बाधा आणणारा कायदा होता. शिवाय *Public Sefty Bill* ने नागरी स्वातंत्र्यावर गदा येणार होती आणि कामगारांना संघटना तयार करण्यास मज्जाव करण्यात येणार होता. या कायद्यांना विरोध करण्यासाठी आणि आपले संघटन मजबूत करण्यासाठी हिंदूस्थान सोशॅलिष्ट रिपब्लिक असोशिएशनच्या कार्यकत्यांनी केंद्रीय कायदेमंडळात बॉम्ब टाकण्याचे ठरविले. या कार्यासाठी भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची नियुक्ती झाली. कायदेमंडळात बॉम्ब टाकण्यामागे या क्रांतीकारकांचा उद्देश कोणाचीही हत्त्या करण्याचा नव्हता. कायदेमंडळात बॉम्ब बरोबर पत्रकेही टाकण्यात आली. या पत्रकांमध्ये असे लिहण्यात आले होते की, "बहिऱ्यांना ऐकू येण्यासाठी आवाज करावा लागतो. "कायदेमंडळात बॉम्ब टाकल्यानंतर भगतसिंग आणि दत्त यांनी तेथून पळून जाण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. ते स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन झाले. कारण न्यायालयामार्फत जुलुमी सरकारविरुद्ध आवाज उठवता येईल अशी या क्रांतीकारकांची धारणा होती. कायदेमंडळात बॉम्ब टाकल्यामुळे भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. यावेळी पोलिसांनी सॉंडर्सच्या हत्त्येसंदर्भात पुरावे देवून लाहोर षडयंत्र केस मध्ये भगतसिंग, राजगुरु, सुकदेव या व्यक्तींवर खटला चालविण्यात आला. या खटल्याच्या काळात भगतसिंग आणि त्यांच्या सहका-यांनी न्यायालयाचा प्रचाराचे व्यासपिठ म्हणून वापर केला. त्यांचे जाबाब वृत्तपत्रातून प्रकाशित होवू लागले. न्यायालयातील त्यांच्या सहस्री कृत्यांनी जनतेमध्ये ते लोकप्रिय बनले. ते "इंकलाब जिंदाबाद", "सम्राज्यवाद मुर्दाबाद", "कामगारांचा विजय असो" अशा घोषणा देवून ते ते न्यायालयात प्रवेश करीत होते. त्यामुळे भारतातल्या प्रत्येक घराघरापर्यंत भगतसिंगाची लोकप्रियता पोहचली.

ब्रिटीशांनी जेलमध्ये या क्रांतीकारकांना अपमानकारक वागणूक दिल्यामुळे या क्रांतीकारकांनी उपोषण सुरु केले.त्यांनी मागणी केली की, या क्रांतीकारकांना उपराध्यांप्रमाणे नाही तर राजकिय कैद्याप्रमाणे वागणुक दिली जावी. या करोता झालेल्या उपोषणात तिव्र इच्छाशक्ती असणारे आणि आर्यलँडच्या टेरेन्स मॅक्सविनीच्या विचारांनी प्रभावीत झालेले युवक जतीन दास यांचा अन्न सत्याग्रहात मूत्यू झाला. त्यांच्या मृत्युमुळे संपूर्ण भारतात असंतोषाची लाट निर्माण झाली. त्यांचे पार्थिव लाहोरहुन कलकत्ता जाणाऱ्या रेल्वेने नेण्यात आले यावेळी प्रत्येक स्टेशनवर हजारोंच्या संख्येने त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती. कलकत्त्याला त् यांच्या प्रेतयात्रेसाठी जवळपास ६ लाख लोक जमले. यावेळी त्यांना अखेरचा निरोप देतांना त्यांचे पिता बकिमबिहारी दास यांनी उद्‌गार काढले "परमेश्वरा आम्ही नादान निघालो. आम्ही आमच्या हातांनी आमची मातृभुमी परक्यांच्या स्वाधीन केली. या अपराधाचे पायश्चित करुन घेण्यासाठी मी माझा जतीन तुला अर्पण करीत आहे. जतीनच्या जिवनापेक्षा त्याने पत्करलेले मरण अधिक परिणामकारक ठरेल. "लाहोरच्या दैनिक ट्रिब्युनने जतीनदास यांच्या विरमरणावर लिहले को, च्भारतात जर कोणी विश्मरण पत्करले असेल आणि तेही उच्च आदर्शाकरीता तर ते जतौनदासने प्रत्येक युगात शहिदाच्या रक्ताने उच्च आणि श्रेष्ठ आदर्श निर्माण केले आहेत. "लाहोर केस आणि इतर खटल्यात अनेक आरोपोंना शिक्षा करुन सेल्युलर जेल मध्ये पाठवण्यात आले. भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना २३ मार्च १९३१ रोजी फाशीची शिक्षा देण्यात आली. त्या दिवशी लोकांनी उपवास केला. त्यांचे फोटो घराघरापर्यंत पोहचले आणि त्यांच्या क्रांतीकार्याच्या गोष्टी लोकप्रिय बनल्या.

## **भारतातील डावी चळवळ (*THE LEFT MOVEMENTS IN INDIA)***

*The Soviet Republic enjoys tremendous popularity among all the Eastern peoples.......for the reason that in us they see an unswerving fighter against imperi- alism. - V. I. Lenin*

डाव्यांची व्याख्या (*Definition of the Left)*

डावे आणि उजवे हा राजकीय शब्दप्रयोग सर्वप्रथम फ्रान्समधे वापरण्यात आला. फ्रेंच क्रांतीदरम्यान क्रांतिसमर्थक (डावे) आणि क्रांतिविरोधक (उजवे) असा शब्दप्रयोग सुरू झाला. पुढे औद्योगिक क्रांतिनंतर आणि समाजवादी व साम्यवादी विचारांच्या उदयानंतर ह्या संज्ञांना व्यापक अर्थ प्राप्त झाला. (*The terms Left and Right were first used as political terms in France during the French Revolution to distinguish the pro-Revolutionaries (the Left) from the anti-Revolu- tionaries (the Right). The terms acquired a wider connotation after the Industrial Revolution and the rise of socialist and communist thought.)*

**भारतात डावी विचारसरणी उदयास येण्यास कारणीभूत स्थिती**

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस निर्माण झालेल्या राजकीय व आर्थिक परिस्थितीमुळे भारतात डाव्या विचारसरणीचा उदय झाला आणि ही विचारसरणी राष्ट्रीय चळवळीशी जोडली गेली. निर्माण झालेली परिस्थिती पुढीलप्रमाणे

(अ) पहिल्या महायुद्धानंतर देशाची आर्थिक परिस्थिती अतिशय शोचनीय झाली. दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या किंमती अफाट वाढल्या, व्यापाऱ्यांच्या भ्रष्टाचारी वृत्तीमुळे देशात जवळजवळ दुष्काळजन्य स्थिती उद्‌भवली. परिणामी भांडवलशाहीची व साम्राज्यावादाची एक घृणित बाजू दिसून आली.

(आ) मार्क्सच्या क्रांतिकारी विचारांनी लोक अत्यंत प्रभावित झाले. रशियात कशा पद्धतीने साम्यवादी शासन प्रस्थापित झाले हह्याचीही नोंद जनतेने घेतली. नव्या सामाजिक व आर्थिक विचारांमुळे बुद्धिजिवींमधे, राजकीय नेत्यांमधे, क्रांतिकारकांमधे तसेच कामगारांमधे खळबळ निर्माण झाली.

(इ) गांधींची स्वदेशी व स्वराज्याची घोषणा आणि ते विचार देशाच्या सर्वदूर जनतेपर्यंत पोहचविण्याच्या प्रयत्नांमुळे राष्ट्रीय चळवळीला एक नवे रुप प्राप्त झाले. हया चळवळीत आता शेतकरी व कामगार सहभागी झाले. समाजवाद रुजण्यास अशाप्रकारे पार्श्वभूमी तयार झालेली होती.

(ई) १९ व्या शतकातील इंग्रजांच्या उदारमतवादी धोरणावरील विश्वास उडालेला आणि बेरोजगारी समोर दिसत असलेला सुशिक्षित मध्यम वर्ग बदलत्या परिस्थितीत वैयक्तिक क्रांतिमार्गाकडे किंवा नव्या क्रांतिकारी समाजवादी विचारसरणीकडे आकर्षित होऊ लागला.

(उ) कडक जहालवादी गट (*radicals)* गांधींच्या दुबळ्या व निसरड्या सुधारणावादामुळे (*Weak Watery reformism)* नाराज होता आणि गांधींना 'प्रतिक्रियावादी शक्तींचा नेता' *(the leader of the forces of reaction)* मानीत होता. गांधींचा अहिंसावाद म्हणजे ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध चाललेल्या लोकलढ्याच्या विकासातील अडथळा होय असे हया गटाचे प्रतिपादन होते. त्यांचे असे मत होते की, आर्थिक व सामजिक आधाराशिवाय स्वराज्याला काहीही अर्थ नाही.

**डावी चळवळ (*The left Movements)***

१९१७ च्या रशियातील क्रांतिनंतर भारतात मार्क्सवाद आला आणि त्याचा प्रसार होऊ लागला, त्या काळातील कामगारांमधील असंतोषाने साम्यवादी विचारसरणीस खतपाणी मिळाले. परिणामी मुंबई, कलकत्ता, कानपूर, लाहोर, मद्रास अशा उद्योगप्रधान नगरांमधे साम्यवादी संघटना स्थापन झाल्या. बंगालमधे 'नवयुग' चे संपादक मुजफ्फर अहमद, मुंबईच्या 'सोशालिस्ट थे संपादक श्रीपाद अमृत डांगे, लाहोरमधील 'इन्किलाब' चे संपादक गुलामहुसेन आणि मद्रासमधे सिंगरवेलू चेट्टीयर हचांनी कामगार व शेतकऱ्यांना पाठिंबा देऊन साम्यवादी विचारांच्या प्रसाराचे कार्य केले. भारतात डावी चळवळ दोन प्रकारे विकसित झाली. (१) आंतर्राष्ट्रीय साम्यवादी चळवळीची एक शाखा म्हणून आणि जी प्रामुख्याने आंतर्राष्ट्रीय साम्यवादी संघटनेमार्फत (*Comintern)* नियंत्रित केली जात होती. (२) कॉंग्रेसची डावी आघाडी (*left wing of congress)* म्हणून असलेला कॉंग्रेस समाजवादी पक्ष (*Congress socialist party)*. हा पक्ष लोकशाही समाजवादापासून प्रेरणा घेत होता. वरील दोन्ही चळवळी भारतातील तत्कालीन साम्राज्यवाद विरोधी भावनांवर आधारलेला होत्या.

## साम्यवादी पक्ष (*The Communist Party)*

मानवेंद्रनाथ रॉय व ताश्कंदमधे असलेल्या इतर भारतीय निर्वासितांनी १९२० मधे भारतीय साम्यवादी पक्ष स्थापन केल्याची घोषणा केली. पुढे १९२४ मधे कानपूर खटला रु होताच सत्यभक्त ने भारतीय साम्यवादी पक्षाची (*CPI)* स्थापन करीत असल्याची घोषणा केली व ते स्वतः सचिव बनले. हथा साम्यवादी चळवळीचा इतिहास ५ अवस्थांमधे विभाजीत केला जाऊ शकतो.

## पहिली अवस्था तीन कटांच्या खटल्यांचा कालखंड (*the Period of Three Conspiracy Trials)*-

मास्कोमधे साम्यवादाचे प्रशिक्षण घेऊन तसेच पुरेशा आर्थिक सहाय्याचे आश्वासन घेऊन साम्यवादी क्रांतिकारकांचा पहिला गट भारतात आला तेंव्हा त्यांच्यावर इंग्लंडच्या राजाविरुद्ध कटकारस्थान रचण्याचा आरोप लावण्यात आला. त्यानंतर भारतीय साम्यवादी पक्षाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी इंग्लंडच्या साम्यवादी पक्षाने घेतली व त्यांच्यातर्फे प्रतिनिधी म्हणून फिलिपस्प्रंट (*philip Spratt)* भारतात आला आणि त्याने येथे अनेक संघटना तयार केल्या, वृत्तपत्रांचे संपादनकार्य केले व युवकांना प्रशिक्षण देणे सुरू केले. बंगाल, मुंबई, पंजाब व उत्तर प्रदेशात कामगार व शेतक-यांच्या चार संघटना स्थापन केल्या. डिसेंबर १९२८ मधे अखिल भारतीय कामगार व शेतकरी पक्ष अस्तित्वात आला. १९२८-२९ मधे साम्यवादी पक्षाने मुंबईला अनेक हरताळ घडवून आणले. हथा काळात साम्यवादी पक्षाने तीन कटांशी संबंध असण्याच्या कारणावरुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले,

पेशावर कट खटला (१९२२-२३), कानपुर कट खटला (१९२४) आणि मीरत कट खटला (१९२९-३३) हथा त्या घटना होत. हयापैकी मीरत कट खटला साडेतीन वर्षे चालला आणि त्यात २७ लोकांना शिक्षा झाली ज्यात जवळजवळ अर्धे लोक व्यावसायिक संघाचे होते (*Trade-unions)*. त्यामुळे साम्यवादी शहीद बनले. साम्यवाद्यांच्या इंग्रजविरोधामुळे राष्ट्रवाद्यांमधे त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली. म्हणूनच त्यांच्यावरील खटल्यांसाठी कॉंग्रेस कार्यकारिणीने एक केंद्रीय बचाव समिती तयार केली व १५०० रु. दिले. हया खटल्यात आरोपींचे वकील म्हणून जवाहरलाल नेहरु, कैलासनाथ काटजू व एफ, एच. अंसारी हथांनी कामकाज पाहिले. आरोपीना भेटायला गांधी तुरूंगात गेले व त्यांनी साम्यवादी नेत्यांप्रती सहानुभूती व्यक्त केली. अशा वातावरणात कॉंग्रेस सदस्यांच्या समर्थनाने साम्यवादी केंद्रीय कायदेमंडळावर गेले आणि साम्यवाद्यांविरुद्ध सरकारने आणलेले सार्वजनिक सुरक्षितता विधेयक (*Public Safety Bill)* त्यांनी संमत होऊ दिले नाही, तसेच दीर्घकाळ चालणाऱ्या खटल्यांचा फायदा घेऊन साम्यवादी नेत्यांनी राजकीय थाटाची भाषणे दिली आणि त्यांना राष्ट्रीय वृत्तपत्रांनी महत्वही दिले. १९३४ पर्यंत भारतात साम्यवादी विचारसरणी रुजली तसेच त्यांच्या चळवळींना प्रतिष्ठा प्राप्त झाली. जुलै १९३४ मधे भारतीय साम्यवादी पक्ष बेकायदेशीर घोषित करण्यात आला.

## दुसरी अवस्था राजकीय एकटेपणाचा कालखंड (*The period of Political wilderness)*

ज्या काळात भारतीय राष्ट्रीय चळवळ गांधींच्या नेतृत्वाखाली वेगाने विकसित होत होती आणि परकीय साम्राज्यवादाविरुद्ध जनतेत प्रचंड जागृती होत होती त्या काळात संघटन आणि विचारसरणी ह्या दोन्ही आघाड्यांवर साम्यवादी चळवळीची खूप हानी झाली. १९२८ च्या साम्यवादी आंतर्राष्ट्रीय संघटनेच्या (*Comintern)* इशान्यानुसार भारतातील साम्यवाद्यांनी काँग्रेसच्या डाव्या व उजव्या गटांवर टिका करणे सुरू केले. हथावेळी काँग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार टाकला होता (१९२८) तसेच पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत केला होता (डिसेंबर १९२९) आणि सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचे ठरविले होते. साम्यवाद्यांचा प्रयत्न काँग्रेसची शक्ती कमी करण्याचा होता. भारतीय कामगारांचे शोषण करणाऱ्या उद्योगपतींचे काँग्रेस समर्थन करत आहे असा साम्यवाद्यांचा आरोप होता, त्यांच्या दृष्टिने साम्राज्यवादी शोषकांइतकीच काँग्रेसही दोषी आहे. गांधींच्या नेतृत्वावर टिका करुन साम्यवाद्यांनी 'संकुचित मध्यमवर्गीय राष्ट्रीय नेतृत्व' असे म्हणून गांधी साम्राज्यवादी शक्तींच्या हातातील खेळणे बनून जनतेच्या क्रांतिकारक चळवळीप्रती विश्वासघात करीत आहेत असा आरोप केला. (*It attacked the petty-bourgeois- nationalist leadership of Gandhiji and charged him with acting as the tool of imperi- alism and thereby betraying the revolutionary struggle of the masses.)* एवढेच नव्हे तर कॉंग्रेसमधील डाव्या गटाला प्रति-क्रांतिकारी म्हणून राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीला तो गट खीळ घालीत आहे असा आरोप केला. पण ह्या त्यांच्या कूटनीतिचा काहीच परिणाम झाला नाही. उलट साम्यवादी पक्ष मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून बाजूला पडला.

**तिसरी अवस्था साम्राज्यवादविरोधी संयुक्त मोर्चा योजना (*Communists and the Anti-Imperialist United Front Plan)***

१९३५ मधे झालेल्या साम्यवादी आंतर्राष्ट्रीय परिषदेतून धोरणात्मक निर्देश प्राप्त करुन मार्च १९३६ मधे आर. पी. दत्त (*Rajni palme Dutt)* आणि बेन ब्रेडले हह्यांनी आपला निबंध भारतात साम्राज्यवाद विरोधी जनमोर्चा (*Anti-Imperialist People's Front in India)* प्रकाशित केला. त्यांनी साम्यवाद्यांना असे सूचित केले की, त्यांनी काँग्रेसमधे प्रवेश करुन कॉंग्रेसच्या संघटनाचा फायदा करुन घ्यावा व काँग्रेसमधील डावा गट (*Congress Socialist Party)* मजबूत करून प्रतिक्रियावादी उजव्यांना (*the reactionary right-wing elements)* बाहेर काढावे. एका समान कार्यक्रमाच्या आधारावर साम्यवादी, कॉंग्रेसमधील डावे (*C.S.P.)* आणि व्यावसायिक संघटनांनी (*Trade Unionists)* एक जनमर्मोर्चा (*Front Populaire)* बनविण्याचे ठरविले. परंतु हा जनमोर्चा बनू शकला नाही कारण व्यापक सामाजिक आधार मिळविण्यात साम्यवाद्यांना बश आले नाही. १९३५ नंतरच्या कालखंडात देशात इंग्रजविरोधी असंतोषाची लाट उफाळून आली आणि त्यात राजकीय पक्षाची भूमिका विसरुन साम्यवाद्यांना सामील व्हावे लागले.

**चौथी अवस्था द्वितीय महायुद्ध आणि साम्यवाद्यांची कोलांटउडी (*The Seond World War and the Communist Somersault)***

द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यावर रशियाच्या निर्देशानुसार भारतातील साम्यवादी नेत्यांनी साम्राज्यवादाविरुद्ध संयुक्त मोर्चा धोरणाचा अवलंब केला. हथा साम्राज्यवादात नाझी व फास्टिस्टांचाही समावेश होता. प्रारंभी युद्धाबाबत कॉंग्रेसचे धोरण स्पष्ट नसल्याने साम्राज्यवादविरोधी आघाडीत साम्यवादी सरस ठरले. पुढे १५ सप्टेंबर १९३९ रोजी काँग्रेसनेही महायुद्धाला साम्राज्यवादी युद्ध असे घोषित केले.

जून १९४१ मधे हिटलरने रशियावर आक्रमण केल्याने भारतातील साम्यवाद्यांची मोठीच पंचाईत झाली. त्यांनी त्वरित कोलांटउडी घेतली आणि कालपर्यंत ज्याला साम्राज्यवादी युद्ध म्हणत होते त्याला आता ते लोकयुद्ध (*People's War)* म्हणू लागले. बदललेल्या स्थितीत भारतीय साम्यवाद्यांनी इंग्रज-रशियन युद्धप्रयत्नांना सहकार्य देणे सुरू केले. त्यामुळे भारत सरकारने साम्यवादी पक्षाला कायदेशीर घोषित केले. ऑगस्ट १९४२ मधे काँग्रेसने 'भारत छोडो' ची घोषणा केली तेंव्हा साम्यवाद्यांनी ही चळवळ आतून पोखरून काढण्यासाठी इंग्रजांकरिता 'गुप्तहेराचे' कार्य

केले. साम्यवादी पक्षाच्या या अचानक धोरणबदलावर राष्ट्रवाद्यांनी कठोर टिका केली. हयातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, भारतातील साम्यवादी पक्षाचे सूत्रसंचालन भारताबाहेरील आंतर्राष्ट्रीय सूत्रधारांकडून होत होते.

**पाचवी अवस्था सत्तांतराच्या वाटाघादी आणि साम्यवाद्यांची बहु-राष्ट्र योजना**

## *(The Transfer of Power Negotiations and Communist's Multi-National Plan)*

हया कालखंडात साम्यवादी पक्षाचे धोरण मुसलमानांचे समर्थन करण्याचे होते. मुस्लिम लिग आणि काँग्रेस हयांच्यातील मतभेदांना खतपाणी देण्याचे, सर्वच अलगपणाच्या भावनांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करुन साम्यद्यद्यांनी असा प्रयत्न चालविला की, भारत छोट्या छोट्या स्वतंत्र राज्यात विभाजित व्हावा. त्यांची व्यूहरचना अशी होती की, हयातील एकाही राज्याची सत्ता हाती आल्यास तेथून आपल्या विचारसरणीचा व सत्तेचा प्रसार करता येईल, पण त्यांच्या हया प्रयत्नांना मुस्लिम लिगने झिडकारुन लावल्याने साम्यवादी पक्ष एक बदनाम पक्ष बनला.

१९४२ मधेच, साम्यवादी पक्षाने एक ठराव संमत करुन असे जाहीर केले होते की भारत बहुराष्ट्रवादी राज्य आहे आणि त्यात कमीतकमी १६ 'राष्ट्रे' आहेत. १९४६ मधे साम्यवादी पक्षाने मंत्रीमंडळ समिती समोर (*Cabinet Mission)* असा प्रस्ताव मांडला की, बाल्कन प्रदेशाप्रमाणे किंवा रशियन समाजवादी सोव्हिएट संघाप्रमाणे भारताला १७ स्वतंत्र सार्वभौम राज्यात विभाजीत केले जावे. हया अशा धोरणबदलामुळे व कोलांटउडयांमुळे भारताच्या राजकीय रंगमंचावर साम्यवाद्यांना जे मानाचे स्थान प्राप्त झाले होते, ते १९४७ पर्यंत नष्ट झाले आणि साम्यवाद्यांबद्दल आता कोणालाही सहानुभूती उरली नव्हती.

ब्रिटीश साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्त होण्याचा ध्यास भारतीय जनतेने प्रकर्षाने घेतला त्यावेळी परकियांच्या निर्देशावर अवलंबून असणाऱ्या साम्यवादी पक्षाबाबत जनतेची भूमिका संशयाची होती. खरे तर साम्यवाद्यांचा श्रमजिवी आंतर्राष्ट्रवाद (*Proletarian Internationalism)* भारतीय राष्ट्रीय आकांक्षांशी (*India's National aspirations)* कुठेच जुळत नव्हता. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे 'वर्गभेद' *(Class antagonism)* आणि हिंसा' *(Violence)* ही मार्क्सवादाची दोन मूळ तत्वे भारतीय परंपरेत बसत नव्हती. मात्र मार्क्स-लेनिनचा 'राष्ट्र-बाहह्य निष्ठा' *(extra-national loyalties)* सिद्धांत स्वतंत्र भारताची काहीसा संबंधित आहे. श्रीमंत आणि गरिबांमधील वाढती खाई आणि अविकसित भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे मार्क्सवादी समाजवादाची मूळे रुजण्यास आणि पददलित, जनतेचे मार्गदर्शन करण्यास उत्कृष्ट भूमी आहे. (*The yawning gap between the rich and the poor and the under-developed condition of India economy are favourable climatic conditions in which Marxist-Socialism can take root in India and serve as the beacon-light for the down-trodden masses.)*

**काँग्रेस समाजवादी पक्ष** (*The Congress Socialist Party)*

गांधींच्या गुढवादाविरुद्ध आणि साम्यवादी पक्षाच्या स्वमतहट्टाविरुद्ध काँग्रेसमधे डावा गट 'विवेकपूर्ण बंड' ह्या स्वरुपात समोर आला. ह्या लोकांना मार्क्सवादापासून व लोकशाही समाजवादापासून प्रेरणा मिळाली. हे लोक साम्राज्यवाद विरोधी, राष्ट्रवादी आणि समाजवादी अशा रुपात प्रकट झाले. सुभाषचंद्र बोसांनी हयाबाबत असे म्हटले की, काँग्रेसमधील डावे लोक केवळ साम्राज्यवादविरोधी होते असे नव्हे तर त्यांना राष्ट्रीय जीवन समाजवादी सिद्धांतांवर आधारित असावे असे वाटत होते. त्यासाठी हह्या डाव्या गटाला दोन आघाड्यांविरुद्ध लढावे लागणार होते. (१) परकीय साम्राज्यवादी आणि त्यांचे भारतीय साथीदार. (२) उजवा गट जो स्पष्टपणे पूर्ण स्वातंत्र्याबद्दल बोलत नव्हता. उजव्या

गटाला (*milk-water nationalists-Rightists)* साम्राज्यवाद्यांबरोबर समझौता करण्यास हरकत नव्हती. डाव्यांना पूर्ण स्वराज्य व समाजवादी अपेक्षित होता पण स्वराज्य सर्वसाधारण जनतेकरिता हवे होते, काही निवडक उच्चवर्गियांसाठी नाही.

संपूर्ण देशात राष्ट्रीय चळवळ लोकप्रिय होत असताना १९२२ मधे गांधींनी अचानक असहकार आंदोलन मागे घेणे, त्याचीच पुनरावृत्ती होऊन १९३१ मधे अंशतः आणि १९३३ मधे पूर्णपणे सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित करणे तसेच १९४० मधे व्यक्तीगत सत्याग्रह करणे हथावर डाव्यांनी जबरदस्त टिका केली आणि ही कृती खऱ्या राष्ट्रभक्तीची नाही असे म्हटले. हया डाच्या गटाचे असे प्रतिपादन होते की अहिंसा आता सहन करण्यापलीकडे आहे आणि त्याला काहीही आधार नाही,

जुलै १९३१ मधे जयप्रकाश नारायण, फूलनप्रसाद वर्मा हयांनी इतरांच्या मदतीने बिहार समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९३३ मधे पंजाब समाजवादी पक्ष स्थापन झाला आणि ऑक्टोबर १९३४ मधे कायदेशीररित्या 'अखिल भारतीय काँग्रेस समाजवादी पक्ष आपल्या घटनेसह व १५ कलमी कार्यक्रमासह स्थापन करण्यात आला.

नव्याने स्थापन झालेला काँग्रेस समाजवादी पक्ष काँग्रेसच्या विरोधातील राजकीय पक्ष नव्हता. तर त्याची स्थापना 'कॉंग्रेसमधे राहून, काँग्रेसला मजबूत करण्यासाठी व त्याच्या धोरणाला वळण देण्यासाठी झालेली होती. (*The Congress socialist party was not a rival political organisation to the congress but was launched 'to work within the congress, to strengthen it, to mould and shape its policies'.)* तरीही काँग्रेसमधील उजवे त्यांना आंतर्राष्ट्रवादी म्हणत होते आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात त्यांच्यावर विश्वास ठेवीत नव्हते. साम्यवादी पक्ष हया गटाला, 'समाजवादी फॅसिस्ट (*social Fascists)* किंवा ढोंगी समाजवादी' *(Fake Socialists)* असे म्हणत. उलट कॉंग्रेसमधील समाजवादी ह्या साम्यवाद्यांना 'रशियाचा उपग्रह' *(Satellites of U.S.S.R.)* असे म्हणत आणि समाजवादाला धोका देणारे व मार्क्सच्या वर्गसंघार्षाच्या सिद्धांताची तोडमोड करणार असे वर्णन करीत.

काँग्रेस समाजवादी पक्षाने १९३५ च्या कायद्याचे वर्णन 'साम्राज्यवादी आणि राष्ट्रीय प्रतिक्रियावादी शक्तिंचे जनविरोधी संघटन (*ant people united front of imperialism and the forces of national reaction)* असे करुन कायद्याचा निषेध केला. १९३७ मधे काँग्रेसची मंत्रीमंडळे बनविण्यास हवा पक्षाचा विरोध होता. वास्तविकता ही होती की, १९३६ मधे कॉंग्रेसने आपल्या निवडणूक घोषणेत जनतेच्या सामाजिक व आर्थिक अडचणी दूर करण्याचा केलेला निश्चय समाजवाद्यांच्या दबावाचा परिणाम होता. द्वितीय महायुद्धात काँग्रेसने ब्रिटीशांना काही अटींवर देऊ केलेले सहकार्य काँग्रेस समाजवादी पक्षाला मान्य नव्हते. त्यांच्या मते हे युद्ध म्हणजे साम्राज्यवादी सत्तांची जगाच्या पुनर्विभाजनाची योजना होय. समाजवाद्यांचे असे म्हणणे होते की, काँग्रेसने स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक सार्वजनिक चळवळ चालवावी. म्हणूनच हथा समाजवाद्यांनी भारत छोडो चळवळीचे समर्थन केले व महत्वाची, भूमिका बजाविली.

सत्तेच्या हस्तांतराच्या वाटाघाटीलाही काँग्रेस समाजवादी पक्षाचा आक्षेप होता, त्यांची अशी धारणा होती की, साम्राज्यवादी, सरंजामशाही आणि जातीयवादी प्रवृत्तींना समूळ नष्ट करण्यासाठी क्रांतिकारी स्वरुपाचा संघर्ष केला जावा.

मुस्लिम लिग इंग्रजांची मदतगार आहे आणि जिना देशद्रोही व साम्राज्यवाद्यांच्या हातातील खेळणे आहे असे समाजवादी मानत. हिंदू-मुसलमानांमधे तकलादू आधारावर होणारे ऐक्य त्यांना मान्य नव्हते. त्यासाठी हिंदू व मुसलमानांना समान असणारा मजबूत आर्थिक आधार हवा असे त्यांचे मत होते. भारताची

फाळणी म्हणजे कॉंग्रेसने इंग्रजांसमोर पत्करलेली सरळसरळ शरणागती होय अशी टिका करतानाच समाजवाद्यांनी अशीही कबुली दिली की, ते स्वतः क्रांतिकारी चळवळ चालविण्यास असमर्थ आहेत.

**इतर छोटे डावे पक्ष (*Minor Leftist Parties)***

१९३९-४० मधे भारतात झालेल्या साम्यवादी चळवळीमुळे अनेक लहानलहान डावे पक्ष अस्तित्वात आले. त्यातील बहुतांश एखाद्या व्यक्तीभोवती केंद्रीत होते. त्यामुळे त्या व्यक्ती काळाच्या पडद्याआड जाताच त्या पक्षांचे कार्यही समाप्त झाले.

**फॉर्वर्ड ब्लॉक (*Forward Block)***

गांधींशी मतभेद झाल्यानंतर मार्च १९३९ मधे सुभाषचंद्र बोसांनी फॉर्वर्ड ब्लॉक ह्या नव्या पक्षाची स्थापना केली. त्यात सुभाषबाबूंनी कॉंग्रेसचे उद्देश, कार्यक्रम हयांचा समावेश केला पण कॉंग्रेसच्या 'वरच्या आदेशपद्धतीवर' *(High command)* त्यांचा विश्वास नव्हता. साम्राज्यविरोधी, जहालवादी, आणि प्रगतीशिल तत्वांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने सुभाषचंद्रने डाव्या एकीकरण समितीची स्थापना केली.

इंग्रजांना मदत करण्याच्या कॉंग्रेसच्या धोरणाला सुभाषबाबूंचा विरोध होता. म्हणूनच इंग्रजांना देशाबाहेर काढण्यासाठी परकीय मदत घेण्याच्या हेतूने ते भारताबाहेर निसटले.

१९४७ मधे सत्तेचे हस्तांतर म्हणजे खोटे हस्तांतर' होय असे फॉर्वर्ड ब्लॉकचे मत होते. 'जनसंघर्ष समाप्त करण्यासाठी भयभीत झालेल्या मध्यमवर्गियांनी इंग्रज साम्राज्यवाद्यांशी केलेला समझौता, असे फॉर्वर्ड ब्लॉकचे प्रतिपादन होते. (*In 1947 the All India Forward Block described the transfer of power as a 'bogus transfer' and alleged that the frightened bourgeois had entered into partnership with British imperialism to defeat the mass struggle.)*

**क्रांतिकारी समाजवादी पक्ष (*Revolutionary Socialist Party)***

१९४० मधे स्थापन झालेल्या ह्या पक्षाची प्रेरणा म्हणजे २० व्या शतकाच्या प्रारंभकाळातील क्रांतिकारकांचे कार्य होय. हिंसेचा अवलंब करुन इंग्रजांना देशाबाहेर काढणे व नंतर भारतात समाजवाद आणणे ह्या पक्षाचे उद्दिष्ट होते. हा पक्ष सिद्धांताच्या दृष्टिने साम्यवादी पक्षापेक्षा कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या अधिक निकट होता. गांधी व सुभाषचंद्र बोस यांच्या भांडणात क्रांतिकारी समाजवादी पक्षाने (*R.S.P.)* बोसांचेच समर्थन केले. द्वितीय महायुद्धात साम्राज्यवादी शक्तींना मदत करण्यास हया पक्षाने नकार दिला. साम्राज्यवादी शक्तींशी रशियाने हातमिळवणी केल्यानंतरही पक्ष आपल्या भूमिकेवर ठाम राहिला. सत्तेच्या हस्तांतराला या पक्षाने 'कॉंग्रेसमधील विश्वासघातकी मध्यमवर्गिय नेत्यांचा साम्राज्यवादाशी मागील दाराने केलेला समझौता' असे म्हटले. (*The party described the Transfer of power and partition as a 'back-door deal between the treacherous bourgeois leadership of the congress and Inperialism'.)*

**इतर लहान पक्ष (*Other Minor parties)***

भारतीय बोल्शेविक पक्ष (*Indian Bolshevik Party)* १९३९ मधे एन. दत्त मुजूमदार हयांनी स्थापन केला. १९४२ मधे सौम्येन्द्रनाथ टागोरांनी क्रांतिकारी साम्यवादी पक्ष (*Revolutionary communist Party)* स्थापन केला. १९४१ मधे अजित रॉय व इंद्रसेन हयांच्या सारख्या ट्रॉटस्कीच्या क्रांतिकारी अनुयायांनी बोल्शेविक लेनिनिस्ट पक्ष (*Bolshevik-Leninist Party)* स्थापन केला. वरील पक्ष स्वतःला भारतीय क्रांतिसाठी सर्वात योग्य असे मानत.

भारतातील साम्यवादी चळवळीचे प्रवर्तक मानवेंद्रनाथ रॉय मार्क्सवादाने निराश झाले होते, त्यांनी १९४० मधे जहाल लोकशाही पक्ष (*Radical Democratic Party*) स्थापन केला. भारतात क्रांति पददलितांद्वारा नाही तर सर्वच वर्गाच्या संघटनाद्वारे होऊ शकते अशी मानवेंद्रनाथांची पक्की धारणा झालेली होती.

**भारतीय औद्योगिक कामगार वर्गाचा विकास आणि व्यवसाय संघटना चळवळ**

*(GROWTH OF INDUSTRIAL WORKING CLASS AND THE TRADE UNION MOVEMENT)*

*Indian labour leaders did not emerge from the ranks of labour. Instead the lead- ers came from India's uppermost strata or even from abroad. These leaders were usually affiliated with one or another political party, and carried their political quar- rels along with them.*

*-D. & A. Thorner*

भारतात प्राचीन काळापासून उद्योगव्यवसाय अस्तित्वात होते. युरोपियनांचे भारतात आगमन भारतातील तयार माल घेण्यासाठीच झाले होते. मात्र भारतात कुटीरोद्योग होते. १८ व्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमधे झालेल्या औद्योगिक क्रांतिमुळे भारतातील कुटीरोद्योग जवळजवळ समाप्त झाले आणि भारत केवळ कच्चा माल उत्पादन करणारा देश बनला.

काळाच्या ओघात भारतातही उद्योगव्यवसाय सुरू झाले. सामन्यतः हा काळ १८५० ते १८७० दरम्यानचा आहे. डलहौसीच्या कारकिर्दीत १८५३ पासून भारतात दळणवळण व्यवस्थेत यंत्रांचा वापर सुरू झाला. रेल्वे रूळ टाकण्यासाठी आणि यंत्रांना लागणारा कोळसा काढण्यासाठी हजारो मजूर काम करू लागले. भारतीय कामगार वर्गाचा हा उदयकाळ होता. रेल्वेशी संबंधित इतरही उद्योग विकसित होऊ लागले.

१८५४ मधे मुंबईला कापड गिरणी आणि कलकत्त्याला ज्यूट गिरणी सुरू झाली. चहा व्यवसायातही शेकडो मजूर कार्यरत होते. कापड उद्योगात १८८६ मधे मजूरांची संख्या ७४,००० होती; ती १९०५ मधे १,९५,००० झाली. तसेच ज्यूट उद्योगात १८७९-८० मधे असलेली २७,४९४ मजूरांची संख्या १९०६ मधे १.५४.९६२ झाली. कोळसा खाणींमधे १९०४ मधे काम करणाऱ्या मजूरांची संख्या ७५,७४९ होती.,

इंग्लंड आणि इतर देशातील मजूरांना प्रारंभीच्या काळात ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले त्या समस्या भारतीय मजूरांसमोरही होत्या. कमी मजूरी, जास्त वेळ काम, कारखान्यांमधील अस्वच्छ वातावरण, बालमजूर, कोणत्याही सवलती नसणे अशा प्रकारचे त्या समस्यांचे स्वरूप होते. हधाव्यतिरिक्त भारतीय कामगारांना परकीय गुलामगिरीचे चटके बसत होते.

परकीय राजवटीमुळे भारतीय कामगार चळवळीत एक वैशिष्ट्य दिसून येते. वसाहतवादामुळे निर्माण झालेल्या विशिष्ट राजकीय परिस्थितीला तोंड देत असतानाच भारतीय कामगारांना परकीय भांडवलदारांच्या व भारतीय

भांडवलदारांच्या शोषणाला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे कामगार संघटनांची चळवळ स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग बनली. अशाप्रकारे भारतीय कामगार आपल्या आर्थिक फायद्यासाठी व देशस्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील होते.

## व्यवसाय संघटना चळवळ (*The Trade union movement)*

व्यवसाय संघटना म्हणजे मजूरी मिळविणा-यांची एक कायम स्वरूपाची संघटना होय, कामगारांचे जीवनमान उंचावणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. (*A trade union may be defined as 'a continuous association of wage-earners for the purpose of maintaining or improving* भारतीय औद्योगिक कामगार वर्गाचा विकास आणि ब्यवसाय संघटना चळवळ *the conditions of their working lives.")* भारतातील कामगार चळवळींना सैद्धांतिक आदर्शानी व राजकीय आकांक्षांनी अतिशय प्रभावित केले.

'भारतीय व्यवसाय संघटनेच्या चळवळीचे दोन आयाम आहेत. (१) कामगारांकरिता औद्योगिक सौदेबाजी करणे तसेच सिद्धांतांचे अनुकरण करणे. (२) साम्राज्यवादाविरुद्ध चाललेला राष्ट्रीय संघर्ष आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित झालेली आंतर्राष्ट्रीय स्वरूपाची कामगार संघटना स्थापन होणे.

## प्रारंभिक इतिहास (*Early History) - 1881, 1991*

ही एक विसंगती होय की, भारतीय उद्योगधंद्यांमधे काम करणाऱ्या मजूरांच्या स्थितीत सुधारणा व्हावी ही मागणी सर्वप्रथम भारतीय मजूरांकडून न होता लैंकेशायरच्या कापड गिरण्यांच्या मालकांकडून झाली. त्यामागे त्यांना अशी मिती वाटत होती की, कमी मजूरीमुळे भारतीय कापड उद्योग त्यांना प्रतिस्पर्धी ठरू शकतो. म्हणून भारतीय कारखान्यांमधील मजूरांच्या स्थितीचे अध्ययन करण्यासाठी त्यांनी एक आयोग स्थापन करण्याची मागणी केली. त्यानुसार १८७५ मधे पहिला आयोग स्थापन करण्यात आला; आणि पहिला फॅक्टरी कायदा १८८१ मधे संमत करण्यात आला, हया कायद्यानुसार ७ वर्षांखालील बालकांना कारखान्यात काम न देण्याचे व १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालमजूरांना कामाचे तास कमी ठेवण्याचे बंधन घालण्यात आले. धोक्याच्या यंत्रांभोवती संरक्षक कठडे लावण्याचे निर्देशही कायद्यात होते. दुसरा फॅक्टरी कायदा १८९१ मधे संमत करण्यात आला आणि त्यात स्त्रियांसाठी कामाचे ११ तास व मधे दीड तास विश्रांती अशी व्यवस्था करण्यात आली. लहान मुलांसाठी असलेली वयोमर्यादा ७ वर्षे आणि १२ वर्षांहून अनुक्रमे ९ वर्षे व १४ वर्षे करण्यात आली. अशाच प्रकारचे कायदे ज्यूट कारखान्यांसाठी १९०९ व १९११ मधे करण्यात आले.

भारतातील राजकीय परिस्थितीपासून भारतीय मजूर स्वतःला वेगळे ठेवू शकले नाही. २० व्या शतकाच्या प्रारंभी त्यांनीही स्वातंत्र्यचळवळीत आपला वाटा उचलला. टिळकांना कारावासाची शिक्षा झाल्याच्या निषेधार्थ मुंबईच्या कामगारांनी सहा दिवसांचा हरताळ पाळला, हयामुळे प्रभावित होऊन लेनिनने अशी कबूली दिली की, भारतीय पददलित इतके परिपक्व आहेत की, हा वर्ग राजकीय लोकसंघर्ष चालवू शकतो. (*the Indian proletariat has already matured sufficiently to wage a class- conscious and political mass struggle.'-Lenin)*

## पहिले महायुद्ध, डावी जागृती व संघटित व्यवसाय संघटनावाद -

## *(First World War, Left Awakening and Organised Trade Unionism)*

पहिल्या महायुद्धाच्या काळात वस्तुंच्या किंमती वाढल्याने उद्योगपतींना प्रचंड फायदा झाला पण त्यामुळे मजूरांची मजूरी मात्र वाढली नाही. १९१५ ते १९२४ हया काळात ज्यूट कारखान्यांनी सरासरी लाभांश १४०% दिला पण मजूरांची सरासरी मजूरी वार्षिक फक्त १२ पौडस् होती. सूती कापडाच्या कारखान्यांनीही सरासरी लाभांश १२०% दिला. हयाच कालखंडात राजकीय रंगमंचावर गांधींचे पदार्पण झाले. त्यांनी आपली स्वातंत्र्य चळवळ अधिक एक व्यापक बनविण्याचा प्रयत्न

केला. त्यादृष्टिने त्यांनी कामगारांना व शेतकऱ्यांना आपल्या चळवळीत सहभागी करून घेतले. कामगारांना राष्ट्रीय व्यवसाय संघटनेत एकत्र आणून राष्ट्रीय चळवळीत आणण्याच्या दृष्टिने हालचाली सुरू झाल्या. त्याचसुमारास रशियात बोल्शेविक क्रांती होऊन आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटना अस्तित्वात आली आणि जगभरातील कामगारांना उद्योगधंद्यांचा कब्जा घेऊन सर्वसामान्यांची क्रांती करण्याचे (*Proletarian Revolution)* आवाहन करण्यात आले. महायुद्धाच्या समाप्तीनंतर राष्ट्रसंघ (*League of Nations)* आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघटना (*International Labour Orga nization)* अस्तित्वात आल्याने मजूरांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले. त्याचेच अनुकरण करून राष्ट्रीय स्तरावर अशी संघटना निर्माण करण्यात राष्ट्रीय पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला आणि ३१ ऑक्टोबर १९२० रोजी '*All India Trade Union congress- A.I.T.U.C*' स्थापन झाली. त्यावर्षी काँग्रेसचे अध्यक्ष असलेले लाला लजपतराय यांनाच आयटूकचे (*A.I.T.U.C.)* अध्यक्ष करण्यात आले. हया संघटनेबरोबर राष्ट्रीय नेत्यांचा सतत संपर्क होता आणि चित्तरंजन दास, व्ही. व्ही. गिरी, सरोजिनी नायडू, जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस यांनी आयटूकच्या अधिवेशनांचे अध्यक्षपद भूषविले. १९२७ पर्यंत आयटूकशी ५७ कामगार संघटना संलग्न झाल्याने त्याची सदस्यसंख्या १.५०५५५ झाली. सुरुवातीच्या काळात आयटूकवर ब्रिटीश मजूर पक्षाच्या समाजवादी लोकशाही विचारांचा प्रभाव होता, समाजवादी विचारांकडे कल असूनही आयटूक नारायण मल्हार जोशींसारख्या मवाळ विचारांच्या लोकांच्या प्रभावाखाली होती. हया मवाळांचे असे मत होते की, हथा मजूर संघटनांच्या राजकीय हालचाली मजूरांची स्थिती सुधारण्यापलीकडे होऊ नये. गांधींच्या अहिंसावादाचा, विश्वस्त कल्पनेचा आणि वर्ग-सहकार्याचा चांगला प्रभाव हया चळवळीवर पडला. त्यामुळे हरताळ शस्त्राचा वापर कमी करण्यात आला. १९२६ च्या संबंधित कायद्याद्वारे हरताळ कायदेशीर ठरविण्यात आला. पण त्यावर काही निबंध होते.

१९२० नंतर साम्यवादी चळवळीच्या प्रारंभामुळे व्यवसाय संघाच्या चळवळीत काहीशी क्रांतिकारी व लढाऊ वृत्ती निर्माण झाली. साम्यवादी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या चौथ्या अधिवेशनात आयटूकला असा निर्देश देण्यात आला की, केवळ 'मजूरी' ह्या विषयापुरतेच आपले कार्य न ठेवता आयटूकने साम्राज्यवाद व भांडवलशाही समाप्त करण्यासाठी प्रयत्नशील झाले पाहिजे. हयाशिवाय भारतीय साम्यवाद्यांना आदेश मिळाला की, त्यांनी आपली चळवळ वर्गाधिष्ठित ठेवावी आणि इतर तत्वांना बाहेर काढावे.

१९२६-२७ मधे आयटूकमधे दोन गट निर्माण झाले. पहिला गट सुधारणावादी होता. त्याला जिनेवा ॲमॅस्टरडॅम अक्ष असेही म्हणत. हया गटाची इच्छा ॲमॅस्टरडॅम येथे मुख्य कार्यालय असलेल्या *International Federation of Trade Unions (IFTU)* शी संलग्न होण्याची होती. दुसरा गट क्रांतिकारी होता, त्याला मास्को गट असेही म्हणत. ह्या गटाला मास्कोहून नियंत्रित होणाऱ्या *Red International Labour Union (RILU)* शी संलग्न व्हावयाचे होते. एकूण साम्यवादी विचारांचा प्रभाव जास्त होता. १९२८ मधे देशात अभुतपूर्व औद्योगिक अशांतता होती. एकूण २०३ हरताळ झाले आणि त्यात ५,०६,८५१ लोक सहभागी झाले आणि ३,१६,४७४०४ दिवसांची कार्यहानी झाली. ह्या हरताळांच्या मागे आर्थिक उद्दिष्ट नसून राजकीय विचार होते. 'क्रांती' हया साम्यवादी वृत्तपत्राने म्हटले, 'भांडवलशाही समाप्त होत नाही तोपर्यंत शांतता निर्माण होणार नाही. कोणत्या आंतर्राष्ट्रीय मजूर संघटनेशी संलग्न व्हावे हयावर एकमत नव्हते. अखेर आयटूकने *Pan Pacific Secretariat* व मास्कोतील *Third International* बरोबर संलग्न होण्याचा निर्णय घेतला, हया निर्णयाच्या विरोधात जोशींच्या नेतृत्वात मवाळपक्षीय आयटूकमधून बाहेर पडले आणि त्यांनी १९२९ मधे अखिल भारतीय ट्रेड युनियन फेडरेशन *(All India Tread Union Federation)* स्थापन केले. ट्रेड युनियन चळवळीची वाढती ताकद पाहून सरकारने त्यावर कायदेशीर बंधने आणण्याचे ठरविले. त्यादृष्टिने १९२८ मधे सार्वजनिक सुरक्षा विधेयक (*Public Safety Bill)* कायदेमंडळात आणण्यात आले पूण त्याला बहुमताने संमती मिळू शकली नाही. म्हणून १९२९ मधे ते अधिनियमाच्या स्वरूपात आणले गेले. कामगार विवाद अधिनियम (*The Trade Disputes Act)* म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्यानुसार इतर • बाबींबरोबरच रेल्वे, डाक, पाणी, विज हयासारख्या सार्वजनिक सेवेतील हरताळासाठी एक महिन्याची पूर्वसूचना देणे बंधनकारक होते. राजकीय कारणासाठी

तसेच पाठिंबा म्हणून हरताळ करण्यावर बंदी घालण्यात आली. औद्योगिक क्षेत्रातील विवाद सोडविण्यासाठी चौकशी समितीची, लवादाची तरतूद कायद्यात होती.

## मीरत कट खटला (*The Meerut Conspiracy Trial)*

मार्च १९२९ मधे इर्विन सरकारने कामगार चळवळीच्या मुख्य नेत्यांना पकडून खटल्यासाठी मीरतला आणले. ३१ कामगार नेत्यांवर प्रमुख आरोप राजद्रोहाचा होता. हा खटला ३१/२ वर्षे चालला आणि त्यात मुजफ्फर अहमद, श्रीपाद अमृत डांगे, जोगळेकर, स्॑ॉट, ब्रेडले, उस्मानी आणि इतर नेत्यांना वेगवेगळी शिक्षा ठोठावण्यात आली. १९२९ ते १९३३ पर्यंत चाललेल्या हया खटल्याने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले आणि त्यावर आईनस्टाइन, एच. जी. वेल्स, हॅरॉल्ड लास्की, रोमांरोला, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट हयांच्यासारख्या जगन्मान्य नेत्यांनी टिका केली. १९३३ मधे ब्रिटीश ट्रेड युनियन कॉँग्रेस व मजूर पक्षाच्या संयुक्त समितीने मीरत खटल्याचे वर्णन '*a Judicial scandal*' असे केले. भारतात आरोपीच्या बचावासाठी डावे व उजवे एकत्र आले आणि त्यांनी व्यापक आधारावर केंद्रीय बचाव समिती स्थापन केली. त्यावेळी झालेल्या कापड मजूरांच्या हरताळात १ लक्ष मजूर सहभागी झाले.

सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या चळवळीत सरकार कामगारांशी अतिशय कठोरपणे वागले. अनेकांना पकडण्यात आले, अत्याचार झाले व कायद्याद्वारे आणि आयोग स्थापन करून कामगारांचा छळ करण्यात आला. परिणामी कामगार नेत्यांमधे ऐक्याची भावना जागृत झाली. १९३४ मधे नव्यानेच स्थापन झालेल्या कॉँग्रेस समाजवादी पक्षाने कामगार ऐक्यासाठी प्रयत्न केले. परिणामी आयटूक, *Red Trade Union congress* आणि *National Frderation of Trade unions* हथा कामगारांच्या तीन संघटना एकत्र आल्या. त्यावेळी त्यांचे एकूण सदस्य ३.२५,००० होते.

## प्रांतीय लोकप्रिय सरकारे आणि कामगार संघटना

## *(Popular Governments in Provinces and Trade Unionism)*

१९३७ मधे सहा प्रांतात कॉँग्रेसचे शासन प्रस्थापित झाल्यावर कामगार संघटनेच्या चळवळीला खूप चालना मिळाली. १९३८ पर्यंत कामगार संघटनांची संख्या २९६ झाली. कामगारांप्रती कॉँग्रेस खनाचे धोरण सहानुभूतिपूर्ण होते. हया काळातील सर्वात यशस्वी हरताळ कानपूरच्या कामगारांनी केला. तो हरताळ ५५ दिवस चालला आणि त्यात ४०,००० कामगारांचा सहभाग होता. त्यावर सरकारने कानपूर कामगार चौकशी समिती नियुक्त केली. त्याचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद होते. अशाचप्रकारे बिहार, मुंबई, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश शासनांनीही चौकशी समित्या नियुक्त केल्या ज्यांनी कामगारांच्या कल्याणासाठी काही शिफारसी सुचविल्या. काही कल्याणकारी कायदेही करण्यात आले. उदा. मुंबई औद्योगिक विवाद कायदा (*Bombay Industrial Disputes Act, 1938)*, मुंबई गुमास्ता कायदा (*Bombay Shop Assis- tants Act, 1939)*, मध्यप्रदेश प्रसुती कायदा (*C.P. Maternity Act, 1939)*, बंगाल प्रसुती कायदा (*Bengal Maternity Act, 1939)*.

## द्वितीय महायुद्धाचा प्रभाव (*Impact of the Second World War)*

द्वितीय महायुद्धात पुन्हा किंमती वाढल्या पण मजूरीत वाढ झाली नाही. १९४० मधे खूप हरताळ झालेत. कारण देशातील स्फोटक राजकीय परिस्थितीचा प्रभाव कामगार संघटनांवरही पडला होता. सप्टेंबर १९४० मधे आयटूकने एक ठराव संमत करून साम्राज्यवादाप्रती तसेच फॅसिस्टवादाप्रती सहानुमुली दर्शविण्यास नकार दिला. असाही प्रतिवाद करण्यात आला की, ज्या युद्धामुळे भारताला स्वातंत्र्य मिळण नाही व कामगार, वर्गाचा कोणताही फायदा होणार नाही त्या युद्धात भारताने सहभागी होणे निरर्थक आहे. (*Participation in a war, which will not result in the establishment of freedom and democracy in India, will not benefit India, much less will it benefit the working class.)* साम्यवादापासून जहाल लोकशाही

नेता (*the communist-turned-Radical Democratic Leader)* बनलेल्या मानवेंद्रनाथ रॉयने आयटूकपासून वेगळे होऊन सरकारचे समर्थन क्रणारी '*Indian Federation of Labour*' नावाची संघटना स्थापन केली. त्याचे बक्षिस म्हणून सरकारने हया संघटनेला दरमहा १३,००० रु. चे अनुदान संमत केले. रशियावर आक्रमण झाल्यानंतर आयटूकमधील साम्यवादाच्या प्रभावाखालील गटाने सरकारला समर्थन देणे सुरु केले. १९४२ मधील भारत छोडो चळवळीत आयटूक मधील राष्ट्रीय गटाला बराच त्रास सहन करावा लागला. पण सरकारचे समर्थन केल्याने साम्यवादी गटाला '*Labour - Management - Government Conciliation Formula*' लागू करण्यात आला. इंग्रजांचे समर्थन केल्यामुळे साम्यवाद्य वैर 'अविश्वसनियतेधा' शिक्का बसला असला तरी राष्ट्रीय नेत्यांना आयट्रकचे नेतृत्व आपल्याकडे घेता आले नाही. परिणामी वल्लभभाई पटेलांसारख्या राष्ट्रीय नेत्यांनी '*Indian National Trade Union Congress*' (*I.N.T.U.C.* - इंदूक) नावाची स्वतंत्र संघटना स्थापन केली. अशा प्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी कामगार चळवळही राजकीय विचारांच्या आधारावर विभाजित झाली.